## अध्यक्षीय मनोगत :

सन २००६ च्या फेब्रुवारी महिन्यापासून - म्हणजे जवळजवळ साडे नऊ वर्षे महाराष्ट्र सेवा संघाचे अध्यक्षपद माझ्याकडे आहे. माझ्यासारख्या सामान्य कर्तृत्व असलेल्या व्यक्तीला अध्यक्ष बनविणे आणि स्वतःच सर्व कामे करून त्याचे श्रेय अध्यक्षांना देणे हा संस्थेच्या विश्वस्तांचा आणि कार्यकर्त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. २०१२ सालच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत माझी अध्यक्षपदावर पुनर्नियुक्ती झाली आणि ती तीन वर्षांची मुदत, यंदाच्या सर्वसाधारण सभेत संपत असल्यामुळे संस्थेशी संबंधित ज्या ज्या व्यक्ती आणि अन्य संस्था आहेत त्या सर्वांविषयी मी अत्यंत मनापासून नम्र कृतज्ञता व्यक्त करतो.

मुलुंडचे केळकर ग्रंथालय आणि ऐरोलीचे सौ. सुनीता म. देवधर ग्रंथालय, दोन्हीकडचे कलाविभाग; तसेच मैत्रेयी आणि मैत्री महिला विभाग; संस्कृत विभाग, अर्थविभाग, आरोग्य विभाग, विज्ञान विभाग हे सगळेच विभाग नेहमीप्रमाणे स्पृहणीय काम करीत आहेत., तसेच ज्ञानेश्वर पुस्तक पेढी, दृष्टिसेवा केंद्र, ग्रंथ तुमच्या दारी, गिरिमित्र संमेलन व संगीत महोत्सव, वाचकसंवाद, विद्यार्थी गुणगौरव, ज्येष्ठ शिक्षक सन्मान, आषाढीची वारी, पितृस्मृती व्याख्यानमाला, निरनिराळे पुरस्कार हेही उपक्रम नित्याप्रमाणे यशस्वी होत आहेत. राज्यनाट्य स्पर्धेत यशस्वी सहभाग आहेच.

यंदाची वैशिष्ट्ये अनेक आहेत.

आपले संस्कृतविषयक सातत्यपूर्ण काम पाहून महाराष्ट्र शासनाने ५४ वी संस्कृत राज्यनाट्य स्पर्धा आपल्या संस्थेत घेतली. दृष्टिसेवा केंद्राचे सर्वच्या सर्व दृष्टिबाधित विद्यार्थी दहावीच्या शालान्त परीक्षेत उत्तीर्ण झाले आणि १०० % यशस्वी निकालाची हॅट-ट्रिक साधली.

सौ. सुनीता देवधर यांच्या उदार देणगीतून स्त्री समाजसेविकेसाठी पहिला 'सावित्रीबाई फुले स्त्री गौरव पुरस्कार' देण्यात आला. तसेच ऐरोलीच्या ग्रंथालयालाही सौ. देवधर यांनी तीन लाख रुपयांची देणगी दिली. त्यांनी आजवर संस्थेसाठी केलेल्या कार्यबद्दल म्हणून ऐरोलीच्या ग्रंथालयाला त्यांचे नाव देण्यात आले.

तसेच संस्थेचे कार्य पाहून मुलुंडमधील एक समाजसेवक श्री. शंकरराव गोखले यांनी त्यांच्या पत्नीच्या स्मरणार्थ वीस लाख रुपये देणगी म्हणून दिले. मुलुंड वास्तूत दुसऱ्या मजल्यावरील सभागृहास कै. सौ. सुविधा शंकर गोखले स्मृती सभागृह असे नाव देण्यात आले.

संस्कृत भाषेच्या प्रचारकास पुरस्कार देण्यासाठी गोरेगाव स्थित ९४ वर्षीय श्री. सुधाकर आठले यांनी रुपये साडे सात लाख देणगी म्हणून दिले.

पहिल्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने 'आरोग्यभारती' या संस्थेच्या सहकार्याने 'मधुमेहमुक्त भारत' या उपक्रमात आपण ७ दिवसांचे योग शिबिर आयोजित केले. फिजिओथेरपी केंद्रालाही चांगला प्रतिसाद आहे. विज्ञान विभागाच्या उपक्रमांमुळे शालेय विद्यार्थी आणि तरुण आपल्या संस्थेशी जोडले जात आहेत.

सध्याच्या नियमांमुळे मुलुंड वास्तूचा पुनर्विकास तितकासा फायदेशीर ठरत नसल्याने ती योजना स्थगित आहे. मात्र मुलुंड वास्तूच्या नूतनीकरण व सुशोभितीकरणाचा मोठा टप्पा पूर्ण झाला.

ऐरोलीतील म.बा. देवधर संकुलातील अभ्यासिकेचा ५५० विद्यार्थी लाभ घेतात. तसेच नेत्रदान, अवयवदान चा चळवळीलाही ऐरोली शाखेने सक्रिय प्रोत्साहन दिले आहे.

एकंदरीत सर्व दिशांनी संस्था प्रगती करीत आहे. भविष्यात व्यवस्थापनामध्ये तंत्रज्ञानाचा वापर वाढवून वेबसाईट प्रभावी करणे, सभागृहाची 'ऑन-लाईन'नोंदणी करण्याची सुविधा, वक्तृत्व इ. कौशल्य विकासाच्या उपक्रमांनी तरुणांचा सहभाग वाढविणे, अशा योजना आहेत. त्या सर्वांच्या सहकार्याने फलद्रूप होतीलच.

अशा या भूषणावह संस्थेच्या कार्यात भाग घेण्यासाठी सर्वांचे स्वागत आहे. अधिकाधिक व्यक्ती आपण होऊन पुढे येतील असा आमचा विश्वास आहे.

।। शुभं भवतु ।।

.....चंद्रशेखर वझे,

अध्यक्ष.

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

विश्वस्त मंडळ

श्री. चंद्रशेखर ना. वझे (अध्यक्ष - पदसिद्ध)

श्री. मधुकर बा. देवधर
श्री. सुरेश ना. पाटणकर
डॉ. आनंद रा. कट्टी
श्री.अजित ग. करंदीकर
श्री. उल्हास कृ. हंबर्डे
श्री. मुकुंद द. भुसारी

**कार्यकारी मंडळ**

पदाधिकारी

श्री.चंद्रशेखर ना. वझे -अध्यक्ष
श्री.चंद्रशेखर. म. कुलकर्णी–उपाध्यक्ष
श्री.जयप्रकाश र. बर्वे -- कार्यवाह
श्री.धनंजय दि. दिवेकर- कोषाध्यक्ष
श्री.विनोद म. सौदागर - सहकार्यवाह
श्री.अरुण मो. भंडारे-सहकार्यवाह
श्री. प्रकाश ह. सडेकर-सहकोषाध्यक्ष
(स्वीकृत १०.८.१४ पासून)

**सदस्य**

श्री.रमेश दे. धामणकर
श्री.रवींद्र द. लाड
श्री.दत्तात्रय व. कुलकर्णी
श्री.प्रदीप श्री. नाटेकर
श्री.प्रदीप र. सप्रे
श्री.विनायक ज. जोगळेकर
श्री. विजय वा. वझे
श्री.प्रभाकर रा. दामले
श्री. सतीश श्री. पाटणकर
अवधूत गोळे
(स्वीकृत१०.८.१४ पासून)
श्री. शंकर गो. वीरकर
(स्वीकृत१०.८.१४ पासून)
श्री. सुधीर वा. बागाईतकर
(स्वीकृत१०.८.१४ पासून)

**ऐरोली व्यवस्थापन समिती**

डॉ. आनंद रा. कट्टी - अध्यक्ष
श्री. प्रदीप र. सप्रे - उपाध्यक्ष
श्री. शंकर गो. वीरकर - कार्यवाह
श्री. सुधीर बागाईतकर -कोषाध्यक्ष
श्री. चंद्रशेखर ना. वझे (पदसिद्ध)
श्री. जयप्रकाश बर्वे (पदसिद्ध)

**मानद अंतर्गत हिशेब तपासनीस**

श्री. श्रीहरी भी. कुलकर्णी (मुलुंडसाठी), श्रीमती ज्योत्स्ना जोशी (ऐरोलीसाठी)

**हिशेब तपासनीस**

मेसर्स सिंगवी, ओतूरकर, केळकर आणि कंपनी (सी. ए.)

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

**मुख्य कार्यालय व्यवस्थापन वर्ग**

श्री. संदीप परब — श्रीमती सुरेखा जोशी

**मुख्य कार्यालय सेवक वर्ग**

श्री. मोहन पवार — श्री. श्रीरंग भाष्टे

श्री. भास्कर इंगळे

**साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय - व्यवस्थापन वर्ग**

श्रीमती अलका चौधरी — श्रीमती आरती रणदिवे

श्रीमती जान्हवी राणे

**साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय सेवक वर्ग**

श्री. प्रदीप वाईकर — श्री. उमेश काणेकर

**ऐरोली शाखा कार्यालय - व्यवस्थापन वर्ग**

श्रीमती मेघा भावे — श्रीमती विनीता घाडीगांवकर

श्रीमती शीतल सगरे — श्रीमती संजना जंगम

**ऐरोली शाखा कार्यालय - सेवक वर्ग**

श्री. रमेश झोंबाड — श्री. शंकर शिंगोटे

श्री. सुरेंद्र राणे

---

**महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड**

म. से. संघ मार्ग व पं. जवाहरलाल नेहरू मार्ग संयोग, मुलुंड (प.), मुंबई ४०० ०८०

दूरध्वनी : ०२२-२५६८१६३१/२५६१ ०२२५

e-mail: mss_mulund@rediffmail.com

Web Site: www.mssmulund.com

**ऐरोली शाखा**

म. बा. देवधर संकुल, म. से. संघ मार्ग, सेक्टर १७,

ऐरोली, नवी मुंबई - ४००७०८

दूरध्वनी : ०२२-२७७९१८३७/ २७७९०८३६

e-mail : mss.airoli@rediffmail.com

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

म. से. संघ मार्ग व पंडित जवाहरलाल नेहरू मार्ग संयोग, मुलुंड (प.)
मुंबई - ४०० ०८०

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड संस्थेच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा (अहवाल वर्ष १ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च २०१५) रविवार, दि. ९ ऑगस्ट २०१५ रोजी सायंकाळी ५.०० वा. संस्थेच्या मुलुंड येथील सु. ल. गद्रे सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. अध्यक्षांच्या प्रास्ताविकानंतर खालील कामांचा सभेत विचार होईल. या सभेला सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

**सभेपुढील कामे**

१. दि. १०.८.२०१४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करणे व इतिवृत्तांत निर्देशित केलेल्या मुद्यांबाबतच्या कार्यवाहीची माहिती घेणे आणि इतिवृत्ताला संमती देणे.
२. कार्यकारी मंडळाने तयार केलेल्या २०१४-१५ सालच्या अहवालास मान्यता देणे.
३. संस्थेच्या वैधानिक हिशेब तपासनिसांनी तपासलेल्या व विश्वस्त आणि कार्यकारी मंडळाने संमत केलेल्या २०१४-१५ सालच्या उत्पन्न व खर्चाचे हिशेब आणि आर्थिक ताळेबंदास मान्यता देणे.
४. २०१५-१६ सालाकरिता अंदाजपत्रक संमत करणे.
५. २०१५-१६ सालाकरिता वैधानिक हिशेब तपासनिसांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
६. २०१५-१६ सालाकरिता मानद अंतर्गत हिशेब तपासनिसांची नियुक्ती करणे.
७. घटना कलम ११(ब) नुसार सभासदांकडून आलेल्या सूचनांचा विचार करणे.
८. घटना कलम १३(२) नुसार विश्वस्त मंडळातील २ रिक्त सदस्याची जागा भरणे.
९. घटना कलम १८(९)नुसार कार्यकारी मंडळातून निवृत्त होणाऱ्या अध्यक्षांची जागा भरणे.
१०. घटना कलम १८(९)नुसार कार्यकारी मंडळातून निवृत्त होणाऱ्या ४ सदस्यांच्या जागा भरणे.
११. ऐरोली शाखेच्या कार्याची माहिती घेणे.
१२. अध्यक्षांच्या परवानगीने येणारी आयत्या वेळची कामे.

**विशेष सूचना**

१. गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागल्यास तहकूब झालेली सभा ३० मिनिटांनंतर त्याच जागी भरेल व त्या सभेत आधीच्याच तहकूब झालेल्या सभेचे कामकाज राहील. या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२. सभासदांना सभांची इतिवृत्ते, हिशेबाच्या वह्या इ. पूर्वसूचनेने सोमवार, दि. २७ जुलै २०१५ ते बुधवार, दि.५ ऑगस्ट २०१५ पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ०७.३० या वेळेत (सुटीचे दिवस सोडून) कार्यालयांत पाहण्यास मिळतील.
३. कोणत्याही सभासदास काही माहिती हवी असल्यास अथवा काही सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी त्या दि.६ ऑगस्ट २०१५ पर्यंत कार्यालयीन वेळांत लेखी स्वरूपात द्याव्यात.
४. सभासदाने आपला पत्ता बदलला असल्यास संस्थेस कळवावा.
५. संस्थेच्या सभासदांची यादी संस्थेच्या कार्यालयांत सभासदांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळांत उपलब्ध होईल. ज्या सभासदाचे नाव यादीत चुकून आले नसेल त्याने ताबडतोब कार्यालयात लेखी कळवावे.
६. अध्यक्षपदावरून श्री. चंद्रशेखर ना. वझे निवृत्त होत आहेत आणि विश्वस्तपदावरून श्री.मु.द.भुसारी व श्री.उ.कृ.हंबर्डे निवृत्त होत आहेत. तसेच कार्यकारी मंडळातून सर्वश्री ज.र.बर्वे, अ.मो.भंडारे, वि.म. सौदागर व र.द.लाड निवृत्त होत आहेत व ते पुन्हा निवडणुकीस उभे राहण्यास पात्र आहेत.

**निवडणूक कार्यक्रम**

१. निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सर्वश्री चं.दि.खरे ,श्रीहरी भी. कुलकर्णी, व सु. स. सहस्त्रबुद्धे यांची निवडणूक समिती नियुक्त करण्यात आली आहे. श्री. चं.दि. खरे निवडणूक समितीचे प्रमुख असतील.

२. अध्यक्ष, २ विश्वस्त व कार्यकारी मंडळातील ४ जागांसाठी निवडणूक रविवार, दि.९ ऑगस्ट २०१५ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळेत गुप्त मतदान पद्धतीने होईल. ३१.३.२०१४ पर्यंत सभासद झालेल्या व्यक्तींनाच या निवडणुकीत मतदान करता येईल.(सभासद क्र. आजीव९०० पर्यंत)

३. निवडणुकीची नामांकन पत्रे दि. २७ जुलै २०१५ ते ३ ऑगस्ट २०१५ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळांत मिळतील.

४. निवडणुकीची नामांकन पत्रे स्वीकारण्याची वेळ दि.४ऑगस्ट २०१५ रोजी सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत आहे.
नामांकन पत्रांची छाननी दि. ४ ऑगस्ट २०१५ रोजी सायंकाळी ७.३० वाजता करण्यात येईल.

५. छाननीनंतर वैध उमेदवारांची यादी दि. ४ ऑगस्ट २०१५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. नामांकन पत्र मागे घेण्याची वेळ दि. ६ ऑगस्ट २०१५ रोजी सायंकाळी ७.३० वाजेपर्यंत असेल.

६ निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या उमेदवारांची अंतिम यादी दि.७ ऑगस्ट २०१५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.

मुलुंड, दि. २० जुलै २०१५ जयप्रकाश बर्वे (कार्यवाह)

**टीप : सभेनंतर सभासदांच्या स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचा सभासदांनी अवश्य लाभ घ्यावा.**

## ऋणनिर्देश

मुलुंड व ऐरोलीतील सर्व स्थानिक लोकप्रतिनिधी, पोलीसखाते, मुंबई महानगर पालिका, नवी मुंबई महानगर पालिका, धर्मादाय आयुक्त, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र शासन, सिडको, वृत्तपत्रे , आकाशवाणी, दूरदर्शन, सर्व दूरचित्र वाहिन्या, सर्व वार्ताहर, एक्सप्रेशन फोटोग्राफिक्स, आय.डी.बी.आय. बँक लि., बँक ऑफ बरोडा, ठाणे जनता सहकारी बँक लि; अपना बाजार, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ग.क. खांडेकर वाचनालय, पॉप्युलर प्रकाशन, ज्येष्ठ नागरिक संघ, मुलुंड पूर्व, रोटरी क्लब ऑफ मुलुंड, श्री. दीपक शहा, कै. अनंत श्रीधर ओक चॅरिटेबल ट्रस्ट, ओक वनौषधी प्रकल्प, डॉ.दीपक घुमे, आरोग्य केंद्राला औषधे व अन्य सहकार्य करणारे मुलुंड व कर्जतमधील सर्व डॉक्टर्स व कार्यकर्ते, डॉ. विकास महात्मे, बॉम्बे मेडिकल एड फाऊंडेशन, दृष्टिसेवा केंदासाठी काम करणारे कर्मचारी, शिक्षकवर्ग, मदतनीस तसेच 'नॅब' यांचे तसेच गिरिमित्र संमेलनाचे तसेच इतर उपक्रमांचे सर्व देणगीदार, महाराष्ट्र सेवा संघाच्या सहकार्याने विविध उपक्रमांचे संयुक्त आयोजन करणाऱ्या सर्व संस्था व त्यांचे पदाधिकारी, संस्थेला विविध सेवा पुरविणारे सर्व कंत्राटदार, कामत बॅन्क्वेटस् चे श्री. सतीश कामत , वैधानिक हिशेब तपासनीस मे. सिंघवी ओतूरकर व केळकर आणि कं. मानद अंतर्गत हिशेब तपासनीस श्री. श्रीहरी भी. कुलकर्णी, चंद्रकांत पांपट, श्री. माधव शिरवळकर, समीर कर्वे, चिंतामणी भिडे, अजय पाटणकर, 'लोकसत्ता' चे श्री. विकास महाडिक, 'सकाळ' चे संपादक श्री. विजय पात्रूडकर, श्री. आनंद मते, अभ्युदय बँक, कॉर्पोरेशन बँक, स्टेट बँक ऑफ त्रावणकोर, केसरी टूर्स, मुलुंड व ऐरोलीचे सर्व कार्यकर्ते आणि आमचे सर्व सभासद, हितचिंतक, व संस्थेचे सर्व काम आपुलकीने करणारा आमचा मुलुंड व ऐरोली येथील कार्यालये , ग्रंथालय व्यवस्थापन , सेवक वर्ग या सर्वांनी दिलेल्या बहुमोल सहकार्याबद्दल आम्ही ऋणी आहोत.

जयप्रकाश बर्वे (कार्यवाह) चंद्रशेखर वझे (अध्यक्ष)

**टीप -**

अहवाल अद्ययावत करण्यासाठी त्यात संस्थेतील जून १५ पर्यंतच्या घडामोडी देण्यात आल्या आहेत याची कृपया नोंद घ्यावी.
आर्थिक नोंदी मात्र ३१ मार्च २०१५ पर्यंतच्या आहेत.

**पदाधिकारी सभा - उपस्थिती तपशील**

| अनु.क्र. | पदाधिकाऱ्याचे नाव | विश्वस्त | विश्वस्त व कार्यकारी मंडळ | कार्यकारी मंडळ |
|---|---|---|---|---|
| | **एकूण सभा ➔** | **२** | **४** | **९** |
| १ | श्री. चं.ना.वझे | २ | ४ | ९ |
| २ | श्री. म.बा.देवधर | १ | ३ | - |
| ३ | श्री. सु.ना. पाटणकर | - | ३ | - |
| ४ | श्री.आ.रा. कट्टी | १ | ३ | - |
| ५ | श्री.मु.द.भुसारी | २ | ३ | - |
| ६ | श्री.अ.ग. करंदीकर | २ | ३ | - |
| ७ | श्री. उ.कृ.हंबर्डे | २ | ३ | - |
| ८ | श्री.चं.म.कुलकर्णी | - | ४ | ८ |
| ९ | श्री.ज.र.बर्वे | - | ४ | ९ |
| १० | श्री.ध.दि.दिवेकर | - | २ | ७ |
| ११ | श्री.र.द.लाड | - | ३ | ९ |
| १२ | श्री.अ.मो.भंडारे | - | ४ | ७ |
| १३ | श्री.वि.म. सौदागर | - | ३ | ९ |
| १४ | श्री.र.दे.धामणकर | - | १ | ५ |
| १५ | श्री. प्र.र. सप्रे | - | २ | ७ |
| १६ | श्री.द.व.कुलकर्णी | - | - | ३ |
| १७ | श्री.वि.ज.जोगळेकर | - | ३ | ५ |
| १८ | श्री. प्र.श्री. नाटेकर | - | ४ | ९ |
| १९ | श्री.प्र.रा. दामले | - | ३ | ७ |
| २० | श्री.वि.वा.वझे | - | ४ | ५ |
| २१ | श्री.स.श्री.पाटणकर | - | २ | ७ |
| २२ | श्री. अ.पं. गोळे | - | १ | ६ |
| २३ | श्री.प्र.ह.सडेकर | - | ४ | ६ |
| २४ | श्री.सु.वा. बागाईतकर | - | - | ४ |
| २५ | श्री.शं.गो.वीरकर | - | ४ | ७ |

**सभासदांना मिळणाऱ्या सवलती**

संस्थेच्या सभासदांस, सभासदत्वास एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर केवळ त्यांच्या स्वतःच्या किंवा त्यांच्या मुलांच्या वा मुलींच्या लग्न, मौंजीबंधन, या कार्यांसाठीच सु.ल.गद्रे सभागृहाच्या भाड्यात रु.३,०००/- व सभागृह क्र.२च्या भाड्यात रु. २,०००/-ची सूट मिळते. एका सत्रासाठी नोंदणी केल्यास अनुक्रमे रु.१,५००/- व रु.१,०००/-ची सूट मिळते. तसेच ऐरोली येथे भाड्यात रु.१,०००/- ची सूट मिळते.

**सभासद संख्या**

| सभासद श्रेणी | मार्च१४अखेर सभासद संख्या | अहवालसाली झालेले सभासद | दिवंगत झालेले सभासद | मार्च १५ अखेरीस सभासद संख्या |
|---|---|---|---|---|
| सन्माननीय | ७ | – | - | ७ |
| आधारस्तंभ | १३ | - | - | १३ |
| आश्रयदाते | ५ | - | - | ५ |
| आजीव | ७०१ | २७ | ११ | ७१७ |
| **एकूण** | **७२६** | **२७** | **११** | **७४२** |

**अहवाल वर्षी सांस्कृतिक सभासद - मुलुंड येथे १७३ / ऐरोली येथे -३५**

सभागृह नोंदणीचा तपशील - अहवालवर्षी आपल्या संस्थेच्या सभागृहांत झालेले कार्यक्रम - **मुलुंड वास्तू**

| कार्यक्रम | सभागृह क्र.१व२ | सभागृह क्र.१व२ | सभांगण | सभागृह क्र.४ |
|---|---|---|---|---|
| लग्न,मुंज इ. प्रदर्शने, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम | ५०पू | ३८स | १पू / ५ स | १६ |

**ऐरोली वास्तू**

| कार्यक्रम | सभागृह क्र.१ | तळमजला | सभागृह क्र.२ |
|---|---|---|---|
| लग्न,मुंज इ. प्रदर्शने, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम | ४०पू / १५स<br>१३पू / ७ स | ४०पू / १५स<br>१२पू / १८स | १४६ |

पू -पूर्ण वेळ, स-सत्रवार

**श्रद्धांजली**

श्री. केशव वा देव (आ.दा.९), श्री विठ्ठल शेडगे (आजीव ५२), श्री.खंडूभाई देसाई (आजीव १५८), श्री.काशीनाथ घागरे (आजीव१९७), श्री. प्रेमकुमार गोहील (आजीव २४२), श्री. नरेंद्र नी. खरे (आजीव २५३), श्री. विश्वनाथ जोशी (आजीव ३६५), श्री. गोविंद देशपांडे (आजीव ३९५), श्री. भाऊराव चव्हाण (आजीव ४२८), श्री. राजीव गुजर (आजीव ५५३), श्री. कमलाकर बक्षी (आजीव ४७४), या साऱ्यांचे अहवालसाली निधन झाले. त्यांना संस्थेच्या वतीने श्रद्धांजली!

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

अहवालसाली श्री. सुरेश फाळे (भाडेकरू -म से.संघ), श्री नरेश पाटील(ज्येष्ठ पत्रकार), श्री. बिंदूमाधव जोशी (क्रिकेट समीक्षक), श्री. निनाद बेडेकर (इतिहास तज्ज्ञ), श्री. नामदेव ढसाळ (दलित लेखक), श्री. गोपाळ बोधे (छायाचित्रकार), ज्येष्ठ रंगकर्मी श्री. आत्माराम भेंडे, योगाचार्य अय्यंगार, श्री. शंकर वैद्य (कवी), श्री. विलास सारंग (लेखक) या साऱ्या महनीय व्यक्तींचे निधन झाले. महाराष्ट्र सेवा संघाच्या वतीने ही विनम्र आदरांजली!

## महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड व ऐरोली शाखांच्या उपक्रमांसाठी तसेच स्थिर निधीसाठी मिळालेल्या देणग्या

| अनु. क्र. | तपशील | रुपये |
|---|---|---|
| | | |
| **गिरिमित्र संमेलनासाठी** | | |
| १ | एएए ऑक्शनर्स अॅन्ड कॉन्ट्रॅक्टर्स प्रा. लि. | १०,००० |
| २ | वायरकर्स इंजिनियर्स | १०,००० |
| ३ | प्रॉडक्ट प्रमोशन्स | २५,००० |
| ४ | अलाईड सेफ्टी इक्विपमेंट प्रा. लि. | १०,००० |
| ५ | इतर | ३५,००० |
| | **एकूण** | **९०,०००** |
| **आरोग्य विभागासाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | किरण देशमुख | २५,००० |
| २ | इतर | १०,००० |
| | **एकूण** | **३५,०००** |
| **विविध पुरस्कारांसाठी तसेच संस्थेच्या उपक्रमांसाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्रीमती सविता गद्रे (पुरस्कारांसाठी) | १,५०,००० |
| २ | भा.ल. महाबळ (पितृस्मृती) | ५०,००० |
| ३ | जी.एस.बी.सभा | २५,००० |
| ४ | श्री. म.बा. देवधर (मुलुंड) | २,००,००० |
| ५ | श्री. म.बा. देवधर (ऐरोली) | ३,००,००० |
| ६ | देवी अहिल्याबाई होळकर एज्युकेशनल ट्रस्ट } **कॉर्पस** | १०,०००,०० |
| ७ | श्री. शंकर दत्तात्रय गोखले } **कॉर्पस** | २०,०००,०० |
| ८ | श्री. चंद्रशेखर ना. वझे | १०,००१ |
| ९ | इतर | १,१२,७०१ |
| | **एकूण** | **३८,४७,७०२** |
| **ग्रंथालयासाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्री. सु.ना. पाटणकर (साहित्य साधना पुरस्कारासाठी) | १५,००० |
| २ | ज्ञानेश्वर पुस्तक पेढी | ४,५०१ |
| | **एकूण** | **१९,५०१** |
| **विज्ञान विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | प्रकाश सडेकर | १०,००० |
| | **एकूण** | **१०,०००** |
| **दृष्टिसेवा अभ्यासिकेसाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्रीमती अपर्णा नायगांवकर | ११,००० |
| २ | श्रीमती पूर्वा कुलकर्णी | १०,००० |

| अनु. क्र. | तपशील | रुपये |
|---|---|---|
| ३ | श्रीमती मीना खाडिलकर | ६०,००० |
| ४ | इनर व्हील क्लब ऑफ मुलुंड | २६,००० |
| ५ | श्री. अजित करंदीकर | ५१,००० |
| ६ | एम.के.मेहेंदळे , माया कोल्हटकर | १,००,००० |
| ७ | इतर | १४,९१४ |
| | **एकूण** | **३,५२,९१४** |
| **अर्थ विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्री. हेमंत रणदिवे | १०,००० |
| २ | दांडेकर फर्निचर | १०,००० |
| ३ | श्रीमती अश्विनी अ.करंदीकर | ५०,००० |
| ४ | इतर देणग्या | १०,००० |
| | **एकूण** | **८०,०००** |
| मैत्रेयी विभागाला मिळालेल्या देणग्या | | |
| १ | सिमंतिनी काळे | २,५०० |
| | **एकूण** | **२,५००** |
| **संस्कृत विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्री. वसंत गोडबोले | ११,००० |
| २ | अध्यक्ष, संस्कृत भाषा संस्था | ११,००० |
| ३ | डॉ.सिंधुताई डांगे | १०,००० |
| ४ | श्री. विवेक पत्की | १०,००० |
| ५ | श्री. श्रीकांत टेंबे | १०,००१ |
| ६ | श्री. मुकुंद पां. रानडे | १०,००० |
| ७ | श्रीमती संगीता म्हात्रे | १०,००० |
| ८ | श्री. राजन वैद्य (MZSK ASSOCIATES ) | १०,००० |
| ९ | श्री. वसंत ग. रानडे | १,००,००० |
| १० | डी.व्ही बल्लाळ | १०,००० |
| ११ | सतीश कामत (स्मरणिका जाहीरात) | १०,००० |
| १२ | दीपक शहा | १०,००० |
| १३ | पितांबरी प्रॉडक्ट्स प्रा. लि. | १०,००० |
| १४ | यशोदाबाई गोविंद गंगाधर चॅरिटेबल ट्रस्ट | १०,००० |
| १५ | शैलजा मालेकर | २५,००० |
| १६ | इतर | १,०६,१३८ |
| | **एकूण** | **३,६३,१३९** |

## संस्थेने दिलेल्या देणग्या

| अनु. क्र. | देणगी दिलेली संस्था | देणगी रक्कम- रुपये |
|---|---|---|
| १ | आचार्य अत्रे जयंती - मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय | ५,००० |
| २ | जीवन आनंद संस्था | १०,००० |
| ३ | नववर्ष स्वागत यात्रा समिती | ३,००० |
| ४ | महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था (पुणे) -शैक्षणिक | ५,००० |
| ५ | शैक्षणिक देणगी | १०,००० |
| ६ | आरोग्यविषयक देणगी | ३,००० |
| | **एकूण** | **३६,०००** |

## महाराष्ट्र सेवा संघाचे श्रीमती सविता गद्रे पुरस्कृत विविध पुरस्कार व इतर कार्यक्रम

| | | | |
|---|---|---|---|
| १ | १४ सप्टेंबर२०१४ | महाराष्ट्र सेवा संघाचा सामाजिक संस्था पुरस्कार | हेल्पर्स ऑफ दि हॅन्डीकॅप्ड, कोल्हापूर<br>प्रमुख पाहुणे - अनंत दीक्षित,<br>मुलाखतकार - प्रकाश सडेकर |
| २ | ११जानेवारी २०१५ | महाराष्ट्र सेवा संघाचा सु.ल. गद्रे साहित्यिक पुरस्कार | पुरस्कारप्राप्त साहित्यिक - डॉ. प्रतिमा इंगोले<br>प्रमुख पाहुणे - डॉ.प्रकाश खांडगे<br>मुलाखतकार - संजय भुस्कुटे |
| ३ | १मार्च २०१५ | महाराष्ट्र सेवा संघाचा सु.ल. गद्रे कलाकार पुरस्कार | पुरस्कारप्राप्त कलाकार - डॉ. मोहन आगाशे<br>प्रमख पाहुणे - फैयाज<br>मुलाखतकार - सुषमा देशपांडे |
| | | **नियमित व इतर कार्यक्रम** | |
| ४ | २९जून२०१४ | महाराष्ट्र सेवा संघ व कामत बॅन्क्वेट्स यांच्या संयुक्त विद्यमाने 'यक्षगान – देवी महात्म्य' | सादरकर्ते -जनप्रिया यक्षगान मंडळ, कुर्ला |
| ५ | १० मे २०१४ | पुस्तक प्रकाशन | |
| ६ | २२ ऑगस्ट२०१४ | वर्षा सहल | पनवेलजवळ माडप येथे |
| ७ | १५ ऑगस्ट २०१४ | झेंडा वंदन | |
| ८ | १६ ऑगस्ट २०१४ | गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी सन्मान सोहळा, रोटरी क्लब ऑफ मुलुंड व अपना बाजार,मुलुंड(प.) यांच्या संयुक्त विद्यमाने | श्री. चं.ना. वझे, श्री. राजेंद्र धुल्ला ,रोटरी क्लब मुलुंड व अपना बाजारचे श्री. अनिल गंगर |
| | | | |
| | | **वर्धापनदिन सोहळा** | |
| ११ | १८ ऑक्टोबर२०१४ | सुरभी एंटरटेनमेंट प्रस्तुत 'सुरीली यादे' | सुप्रसिद्ध चित्रपट संगीत दिग्दर्शक पै.नौशाद व स्व. मदनमोहन यांची हिंदी चित्रपटांतली गाजलेली गाणी |
| १२ | १९ऑक्टोबर२०१४ | असीम एंटरटेनमेंट निर्मित नाटक - काटकोन त्रिकोण | प्रमुख कलाकार - डॉ. मोहन आगाशे |
| १३ | २०ऑक्टोबर २०१४ | 'पंचम' निर्मित 'बोले तो स्वर बासुरीचा' | प्रसिद्ध गीतकार श्री. रमेश आणावकर यांच्या गीतांवर आधारित कार्यक्रम |

# कौतुक सोहळा - गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी सन्मान

महाराष्ट्र सेवा संघातर्फे मुलुंड मधील विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आलेली विविध पारितोषिके :

**कै. राम गणेश गडकरी पारितोषिक** : मार्च २०१४ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत उच्च मराठी विषय घेऊन मराठीत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| सिद्धी राणे | बी.आर. टोळ विद्यालय | ९७/१०० |

**महर्षी अण्णासाहेब कर्वे पारितोषिक** : मार्च २०१४ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| मधुरा मुरलीधरन् | सेठ करमशी कानजी स्कूल | ९७.४० % |

**कै. अंबादास डांगे पारितोषिक** : मार्च २०१४ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत संस्कृत या विषयात सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| मनीष नैनानी | बी.आर. टोळ विद्यालय | १०० |
| स्नेहल प्र. भगत | मुलुंड विद्यामंदिर | १०० |
| अपूर्व सणस | वामनराव मुरांजन | १०० |
| विक्रांत राजेशिर्के | वामनराव मुरांजन | १०० |
| कुशल शहा | सेठ करमशी कानजी स्कूल | १०० |
| रवी विकमशी | सेठ करमशी कानजी स्कूल | १०० |
| दर्शिल देढीया | सेठ करमशी कानजी स्कूल | १०० |

**श्री. सु.ल. गद्रे पारितोषिक** : मार्च २०१४ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंड मधील महानगर पालिकेच्या माध्यमिक मराठी विद्यालयातून सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| दर्शना वि.धिंडाळे | मुलुंड म्युनिसिपल स्कूल | ७५.६० % |
| सुमन वि. गुप्ता | मुलुंड म्युनिसिपल स्कूल | ८२.६० % |
| ममता सं पवार | मुलुंड म्युनिसिपल स्कूल | ८२.६० % |

**कै. विठ्ठलराव व कै. सुशीला घाटणेकर पारितोषिक** : मार्च २०१४ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| प्रणव राव | बी.आर. टोळ विद्यालय | ९८.४० % |

**सौ सुषमा केतकर पारितोषिक :** मार्च २०१४ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंडमधून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| प्रणव राव | बी.आर. टोळ विद्यालय | ९८.४० % |

**कै. डॉ. सदाशिव अं. डांगे स्मृती पारितोषिक :** मार्च २०१४ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंडमधील शाळांतून प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यात व प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| १) प्रणव राव | बी.आर. टोळ विद्यालय | ९८.४० % |
| २) कुशल शहा | सेठ करमशी कानजी स्कूल | ९७.६० % |

**कै. हरेश्वर केशव लोखंडे स्मृती पारितोषिक** : मार्च २०१४ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंड मधील माध्यमिक शाळांतून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| १) दर्शना वि.धिंडाळे | मुलुंड म्युनिसिपल स्कूल | ७५.६० % |
| २) सुमन वि. गुप्ता | मुलुंड म्युनिसिपल स्कूल | ८२.६० % |
| ३) ममता सं पवार | मुलुंड म्युनिसिपल स्कूल | ८२.६० % |

**कै. मुरलीधर सुका चौधरी पारितोषिक** : मार्च २०१४ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंड मधील शाळांतून गणित विषयात उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| प्रणव राव | बी.आर. टोळ विद्यालय | १०० % |

# संस्कृत विभाग

गुरुप्रसाद कार्लेकर (अध्यक्ष) सुमेधा नवाथे (कार्यवाह)

**सदस्य :** चं. ना. वझे, चं.म. कुलकर्णी, भावना दांडेकर, मुग्धा गोळे, प्रसाद गोडसे

**संस्कृत रसास्वाद वर्ग** - १७ ऑगस्ट १९८५ पासून सुरू केलेला हा उपक्रम ह्यावर्षीही जोमाने सुरू राहिला. तैत्तरीय उपनिषद, आत्मबोध हे आदिशंकराचार्यांचे दीर्घ स्तोत्र, अथर्वशीर्ष, उपनिषद व मांडूक्य उपनिषदांतील ॐकार विचार, चिंतन या विषयांचा अभ्यास पूर्ण झाला. एकूण ४१ वर्ग झाले.

**पंचम संस्कृत स्नेहसंमेलन** - २१.०९.२०१४ रोजी पंचम संस्कृत स्नेहसंमेलन आयोजित केले होते. संमेलनाचे अध्यक्षपद डॉ. उमा वैद्य,कुलगुरू, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यापीठ, रामटेक यांनी भूषविले. तर विशेष अतिथी म्हणून श्री. जयराज साळगांवकर, व्यवस्थापकीय संचालक,'कालनिर्णय' हे लाभले होते. प्रमुख अतिथी डॉ. विजय भटकर, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संगणक तज्ज्ञ यांच्या शुभेच्छा श्रोत्यांपर्यंत दृक्-श्राव्य पद्धतीने पोहोचविण्यात आल्या. संमेलनाच्या पूर्वार्धात सौ. मेधा लिमये यांचे 'लीलावती'चे लालित्य हे व्याख्यान तर 'संस्कृत अध्ययनातील समस्या' या विषयावर परिसंवाद आयोजित केला होता. या परिसंवादात डॉ. गौरी माहुलीकर - संस्कृत विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, श्री. सारंग दर्शने - पत्रकार, महाराष्ट्र टाईम्स, श्री. अनिकेत पेंडसे -पत्रकार, साम टीव्ही, डॉ. नीलेश जोशी - वरिष्ठ भाषा शास्त्रज्ञ, आय.आय.टी. मुंबई, श्रीमती सुरेखा जोशी - संयोजक, संस्कृत भाषा संस्था, मुंबई आदि मान्यवरांनी भाग घेतला होता.

उत्तरार्धात 'बाल कलागुणदर्शन' श्रीवत्स बालमंदिरम्, उज्ज्वला थत्ते व त्यांच्या कलाकारांनी सादर केले. सौ. वीणा लोंढे यांचे 'आरोग्याची गुरुकिल्ली - दिशा, काल आणि गती'या विषयावरचे व्याख्यान तर संमेलनाची सांगता आपल्या संस्थेच्या संस्कृत विभागाच्या कलाकारांनी विविध संस्कृत नाट्यप्रवेश उत्कृष्टरित्या सादर करून केली.

**पंडित वासुदेव आत्माराम लाटकरशास्त्री संस्कृत सन्मान पुरस्कार** - संस्थेतर्फे संस्कृतचे अभ्यासक कालनिर्णयकार स्व. जयंतराव साळगांवकर यांच्या संकल्पनेप्रमाणे संस्कृतच्या अध्ययन, अध्यापन व प्रसाराचे उत्तम कार्य करणाऱ्या एका मान्यवरास, प्रतिवर्षी ' पंडित वासुदेव आत्माराम लाटकरशास्त्री संस्कृत सन्मान' पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व रु.५१,०००/- असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या वर्षी या सन्मानाचे मानकरी होते श्री. गणेश्वर सांब दीक्षित - वेदशास्त्र संस्कृत पाठशाळा, सावंतवाडीमध्ये कार्यरत संस्कृत विद्वान यांस डॉ. उमा वैद्य- कुलगुरू, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यापीठ, रामटेक यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

**महाराष्ट्र राज्य संस्कृत नाट्य स्पर्धा** - सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन आयोजित ५४ वी ' संस्कृत राज्य नाट्य स्पर्धा' १९ जानेवारी ते २२ जानेवारी,२०१५ या काळात आपल्या संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचे उद्घाटन संस्थेच्या संस्कृत विभागाचे प्रमुख आधारस्तंभ श्री. प्र. म. भातखंडे यांच्या हस्ते झाले. प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षीही आपल्या संस्कृत विभागाने या स्पर्धेत भाग घेतला होता. 'भगवदज्जुकीयम्' हे एकांकी नाटक, दि. २० जानेवारी,२०१५ रोजी सादर करण्यात आले. सदर नाटकासाठी श्री. गुरुप्रसाद कार्लेकर यांना दिग्दर्शनाचे द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले. श्री. प्रसाद गोडसे, श्री. तक्षिल खानविलकर आणि कु. वृषाली सावंत यांना अभिनयाची गुणवत्ता प्रमाणपत्रे प्राप्त झाली. ना नाटकात कु. जाई कुलकर्णी, सौ. सुमेधा नवाथे, श्री. चंद्रशेखर कुलकर्णी, श्री. इंद्रजीत दुडिले, श्री. कमलेश दळवी यांनीही उत्कृष्ट अभिनय सादर केला. तर तंत्रज्ञ म्हणून श्री. चं.ना. वझे, श्री. आनंद केळकर, श्री. अवधूत गोळे, सौ. भावना दांडेकर, कु. वरदा नवाथे, सौ. मुग्धा गोळे, श्री. राम पाणकर, श्री. केदार गोखले या कार्यकर्त्यांनी आपले योगदान दिले. मार्गदर्शक या नात्याने श्री. प्रभाकर भातखंडे यांनी आपली कामगिरी चोख बजावली.

सहभाग - 'संस्कृत भारती'तर्फे आयोजित केलेल्या संस्कृत संमेलनात ८ फेब्रुवारी,२०१५ रोजी सोमैय्या महाविद्यालयात आपल्या संस्थेतर्फे 'भगवदज्जुकीयम्' ना नाटकाचा प्रयोग उत्कृष्टपणे सादर करण्यात आला.

सुमेधा नवाथे (कार्यवाह) गुरुप्रसाद कार्लेकर (अध्यक्ष)



# आरोग्य विभाग

र. दे. धामणकर - अध्यक्ष, वि. स. जोशी - कार्यवाह

**सदस्य :** र. द. लाड, वि. म. सौदागर, द.व. कुलकर्णी, वि. वा. वझे, अ. मो. भंडारे, वि. ज. जोगळेकर, प्रभाकर दामले

सुजाण आरोग्य मित्रहो, नमस्कार!

संस्थेचे आर्थिक वर्ष नुकतेच संपले. नवीन वर्षाच्या सुरुवातीला अहवालाच्या माध्यमातून सरत्या वर्षातल्या, आम्ही आयोजित केलेल्या कार्यक्रमांचा एक धावता वृत्तांत आपल्या माहितीसाठी सादर करत आहोत. या वर्षातील सर्व कार्यक्रम 'आपले आरोग्य आपल्या हाती' या संकल्पनेवर आधारित आहेत.

**रविवार, दि. २० एप्रिल,२०१४ :** - डॉ. नितीन पाटणकर आणि सहकारी. गायिका : डॉ. उत्तरा चौसाळकर व ध्वनि संयोजक : श्री. संजय मराठे.

भारतीय योगशास्त्राप्रमाणे मानवी शरीरातील ७ चक्रांवर ध्वनी आणि नादाच्या होणाऱ्या बऱ्या-वाईट परिणामांमुळे शारीरिक व मानसिक रोग बरे होऊ शकतात. या सुलभ व मनोरंजक माहितीने आपले आरोग्य व जीवन सुखकर करता यावे असा आमच्या आरोग्य विभागाचा, हा कार्यक्रम आयोजित करण्यामागे उद्देश होता.

**शनिवार, दि. २८ जून २०१४ :** - बॉम्बे हॉस्पिटलचे प्रख्यात डॉक्टर व मधुमेह तज्ज्ञ डॉ. आनंद गोकाणी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. 'मधुमेह' हा 'कॅन्सर'पेक्षा अधिक भयानक विकार असून ,त्याचे शरीरातील प्रमाण वाढल्यास, आपल्या इतर अवयवांना कसा बाधक ठरतो, त्यासाठी घ्यावयाची काळजी, पाळावयाची पथ्ये, आपल्या निरोगी, सुखी आयुष्यासाठी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले व श्रोत्यांच्या शंकांचे निरसनही केले.

**रविवार, दि. २७ जुलै,२०१४ :** - 'स्वस्थ जीवनशैली - कला आणि विज्ञान' या विषयावर 'आरोग्य भारती' या अखिल भारतीय पातळीवरील संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य विभागाने एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. या उपक्रमाला तमाम मुंबईकरांनी भरघोस प्रतिसाद दिला. महनीय व मान्यवर वक्त्यांनी आपल्या संशोधनानुसार, आपले विचार मांडून छान मार्गदर्शन केले.

| क्र. | व्याख्यानाचा विषय | वक्ते |
|---|---|---|
| १ | संगीत व स्वास्थ्य | डॉ. विद्याधर ओक व चंद्रशखर वझे |
| २ | आरोग्य - स्वस्थ जीवनशैली - एकात्मिक दृष्टिकोन | डॉ. संजय ओक व पद्मभूषण डॉ. आर्.डी. लेले |
| ३ | स्वस्थ जीवनशैलीसाठी मनःस्वास्थ्य | डॉ. जान्हवी केदारे, श्री. प्रमोद लेले |
| ४ | आधुनिक आरोग्यसेवेमध्ये होमिओपॅथीचे योगदान | डॉ. सुजाता नाईक, डॉ. प्रमोद पागे |
| ५ | स्वस्थ जीवनशैलीसाठी अध्यात्मिक स्वास्थ्य | डॉ. सचिन परब, डॉ. शुभांगी पारकर |
| ६ | स्वस्थ जीवनशैलीसाठी योग | डॉ. अजित घांग्रेकर, श्री. रामचंद्र सुर्वे |
| ७ | आहार, विहार, ऋतुचर्येचा स्वस्थ जीवनशैलीशी संबंध | डॉ. हृषिकेश म्हेत्रे, डॉ. अविनाश सुपे |
| ८ | सांस्कृतिक परंपरा, सण आणि स्वस्थ जीवनशैलीच्या दृष्टिकोनातून वैज्ञानिक संबंध | डॉ. सुविनय दामले, डॉ. श्याम नाबर |

**शनिवार, दि. २७ सप्टेंबर,२०१४:-** डॉ. विनोद गोयल - नेत्र शल्यविशारद, यांचे व्याख्यान. विषय : आपले डोळे, त्यांची निगा व आधुनिक तंत्रानुसार केल्या जाणाऱ्या डोळ्यांच्या निरनिराळ्या रोगांवरील शस्त्रक्रिया.

**मंगळवार, दि.२८ ऑक्टोबर,२०१४ :** 'प्रबोधन आरोग्य पेढी' गोरेगाव मुंबई यांचे 'जेनेरिक औषधे' या विषयावर मार्गदर्शन मिळाले तसेच डॉ. मृदुला बेळे यांचे 'औषधाचे राजकारण' या विषयावरील व्याख्यानात त्यांनी 'जेनेरिक औषधांची उपयुक्तता व उपलब्धता' याबाबत अत्यंत मोलाची माहिती दिली. 'जेनेरिक औषधे' या विषयावर प्रेरित होऊन संस्थेच्या आरोग्य विभागाचे अध्यक्ष श्री. रमेश धामणकर यांनी स्वतः पुढाकार घेऊन २६ एप्रिल,२०१५ मुलुंडमधील नागरिकांसाठी मुलुंड(पू.) येथे मेडिकल सुरू करून नामवंत कंपन्यांची 'जेनेरिक औषधे' सवलतीच्या दरात मिळण्याची सोय केली आहे.

**शनिवार, दि. १५ नोव्हेंबर, २०१४ :** - १) 'कॅन्सर' बद्दलची जागृती आणण्यासाठी कार्यशाळा. विषय : कर्करोग आणि अनुवंशिकता - आक्रमण व बचाव. वक्त्या : डॉ. रितू बियाणी (यांनी स्वतः कर्करोगापासून मुक्ती मिळविली आहे व आता सर्वसामान्य जीवन जगत आहेत.),
२) डॉ. प्रज्ञा कोटक : देशात ११ लाख कॅन्सरचे रुग्ण आहेत. त्यांच्यातील अज्ञान, अपुरी माहिती, आळस व भीती, रोगाचे गांभीर्य लक्षात न घेता व योग्य वेळी उपचार न केल्याने, तसेच योग्य मार्गदर्शनाच्या अभावी हा रोग बळावतो.

**शनिवार, दि. २७ डिसेंबर,२०१४ :** - विषय : देहदान, नेत्रदान, अवयवदान
तज्ज्ञांचे मार्गदर्शन : श्री. प्रकाश सैंदाणे - अवयवदान, श्री. प्रशांत आगळे - नेत्रदान, श्री. विनोद हरिया - देहदान व डॉ. शिल्पा कर्णिक - त्वचादान

**शनिवार, दि. १४ मार्च,२०१५ :** - विषय : दातांचे कार्य , आरोग्य आणि आधुनिक उपचारांचे तंत्र. व्याख्याते : डॉ. रामचंद्र कबीर

बॉम्बे मेडिकल एड फाऊंडेशन यांच्या सहकार्याने मुलुंड(प.) येथे सुरू करण्यात आलेल्या धर्मादाय दवाखान्याचा व भौतिक उपचार (फिजिओथेरपी) केंद्राचा लाभ अनेक रुग्ण घेत आहेत.

विजय जोशी (कार्यवाह) | रमेश धामणकर (अध्यक्ष)

## आपुलकी

संपादक - चंद्रशेखर वझे, कार्यकारी संपादक - सुषमा पाटणकर, संपादन साहाय्य : दत्तात्रय व. कुलकर्णी, विनोद सौदागर, रवींद्र लाड, इंदिरा कुलकर्णी, रजनी करंदीकर, अरुण भंडारे.

'आपुलकी' या त्रैमासिक मुखपत्राची वाटचाल यशस्वीपणे सुरू आहे. या अहवाल वर्षात दिवाळी अंकासहित चारही आवृत्यांमध्ये विविध विषयांवरील लेख, मुलुंड वा मुलुंड परिसरातील यशस्वी व्यक्तींचे परिचय, आरोग्य, संगीत, भाषा, नाट्य, सामाजिक समस्या इ. विषयांवरील सकस लेख प्रसिद्ध झाले; थोडक्यात सांगायचे झाल्यास 'आपुलकी'च्या धोरणास अनुसरून सकारात्मक, विधायक, व प्रेरक अशा विषयांवरील साहित्य प्रसिद्ध करण्यात आले. उपक्रमाला वाचकांचा चांगला प्रतिसाद लाभतो आहे.

सुषमा पाटणकर,
कार्यकारी संपादक, आपुलकी

*संस्थेच्या आरोग्यविषयक सामाजिक सेवेच्या कल्पनेतून गेली अनेक वर्षे संस्थेत कार्यरत असलेले श्री. रमेश धामणकर यांनी सवलतीच्या दरात 'जेनेरिक औषधे'मुलुंड (पू.) येथे उपलब्ध करून दिल्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचे अभिनंदन!*

# मैत्रेयी- महिला विभाग

माधवी भुसारी( अध्यक्ष), प्रियांका मोकाशी (कार्यवाह), रजनी करंदीकर (सहकार्यवाह )
सदस्य : सुषमा पाटणकर, सुनीता देवधर, इंदिरा कुलकर्णी, वासंती वैद्य, सुमती खरे, नंदिनी हंबर्डे, रश्मी अनगळ, वीणा नाटेकर, मेधा देव.

मैत्रेयी म्हणजे महिलांचं हक्काचं व्यासपीठ ! यावर्षी देखील मैत्रेयीने इतर मान्यवरांबरोबरच स्थानिक महिलांनाही कार्यक्रम सादर करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

**दि. ३ जून २०१४ : मुक्तसंवाद** या कार्यक्रमांतर्गत पुढील दिलेल्या विषयांवर उपस्थित मैत्रिणींनी आपले विचार मांडले.
विषय : १) मैत्रेयीकडून काय अपेक्षा आहेत ? २) खरेदी-किती आवश्यक किती अनावश्यक ३) आयुष्यातील कडू-गोड आठवणी.

**दि. १७ जून २०१४ : 'चैतन्याचे झाड '** हा लोकप्रिय लेखक शं.ना.नवरे यांच्या साहित्यावर आधारित कार्यक्रम सुहास कराडकर, मेधा देव व स्मिता जोशी यांनी सादर केला. 'महानंदा' या नाटकातील नाट्यप्रवेशाच्या अभिवाचनामुळे कार्यक्रमात रंगत आली.

**दि. १ जुलै २०१४ : टांझानियन जंगल सफारी** : सादरकर्त्या - रजनी करंदीकर या दृक्श्राव्य कार्यक्रमातून श्रोत्यांना खरोखरच जंगल सफारीचा आनंद मिळाला.

**दि. १५ जुलै २०१४: भाषण : एकनाथ-जनार्दन स्वामी गुरुशिष्य नाते :** गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित केलेल्या या विशेष कार्यक्रमात प्रभा साळवेकर यांनी गुरुशिष्य नात्यातील काही अनभिज्ञ पैलूंवर विवेचन केले

**दि. ५ ऑगस्ट २०१४ :** शिवाजी महाराजांची पत्नी पुतळाबाई यांच्यावर आधारित धाकट्या राणीसाहेब या कादंबरीच्या लेखिका प्रा. वर्षा मुळे यांनी शिवाजी महाराज, पुतळाबाई व संभाजी महाराज यांच्यातील नातेसंबंध उलगडून दाखविले.

**दि. १९ ऑगस्ट २०१४ : भाषण : श्रावणातील सणांमागील वैज्ञानिक दृष्टिकोन :** डॉ. सुचेता सावंत यांनी परंपरेने चालत आलेल्या या सणांमागील वैज्ञानिक व आरोग्यपूर्ण दृष्टिकोनाचे महत्व विशद केले.

**दि. १६ सप्टेंबर २०१४ : भाषण : पानोपानी :** पुस्तकांच्या पानापानातून सौंदर्य उलगडून दाखवित मंगला गोखले यांनी त्यातील उदात्त सुंदर विचार श्रोत्यापर्यंत अलगदपणे पोहचविले.

**२६ सप्टेंबर २०१४ :** मुलुंडमधील सर्व महिला मंडळांच्या सहकार्याने **५१ वा शारदोत्सव** संपन्न झाला. कथांमधील अद्भूत रस या विषयावर वसुधा पंडित यांचे अभ्यासपूर्ण भाषण झाले. त्यानंतर शीला जोशी व सहकारी यांनी लोकगीते कालची व आजची या कार्यक्रमात पारंपरिक लोकगीतांच्या चालीवर आधुनिक स्त्रीचे प्रश्न मांडले. सहभागी मंडळे :
१)मैत्रेयी २) कल्पना विहार म. मंडळ ३) आराधना म. मंडळ ४) चित्तपावन ब्रा. म. मंडळ ५) रुद्राणी पुरोहिता मंडळ ६) देशस्थ ऋग्वेदी ब्रा. म. मंडळ ७) राष्ट्र सेविका समिती

**दि. ७ ऑक्टोबर २०१४ : चांदणे शिंपित जा तू ...** कोजागिरी पौर्णिमेनिमित्त आयोजित या विशेष कार्यक्रमात चांदणं या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित कविता, आवडलेला उतारा, गाणं सादर करण्याची संधी मैत्रिणींना मिळाली. मुलुंडमधील सुमारे ३५ मैत्रिणींनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.

**दि. ४ नोव्हेंबर २०१४ :** दर महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या मंगळवारी आयोजित **अक्षरमैत्री या उपक्रमाच्या २५० व्या** कार्यक्रमानिमित्त आविष्कार व अंजोर थिएटर निर्मित 'आयदान' या नाटकाचा प्रयोग आयोजित केला होता. उर्मिला पवार यांच्या आत्मकथनावर आधारित या दोन अंकी नाटकाचा अतिशय देखणा प्रयोग सादर झाला.

**दि. १८ नोव्हेंबर २०१४ : डॉक्टर आपल्या भेटीला** या कार्यक्रमांतर्गत डॉ. श्वेता जोग यांनी विविध आजारांसंदर्भात कराव्या लागणाऱ्या विविध प्रकारच्या चाचण्यांविषयी मार्गदर्शन केले.

**दि. २ डिसेंबर २०१४ : केल्याने पर्यटन.....** हा कार्यक्रम आयोजित केला होता. लेखिका पद्मा कऱ्हाडे यांनी हाँगकाँग व सौदी अरेबिया येथे काही काळ वास्तव्य केल्यामुळे तेथील समाजजीवनाचे अनुभव सांगितले. प्रवासाची आवड असणाऱ्या पुष्पा जोशी यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

**दि. १६ डिसेंबर २०१४ : गीत विश्वरूपदर्शन :** श्रीकृष्णाच्या विश्वरुपदर्शनावर आधारित पारंपारिक गीतांचा हा कार्यक्रम सादर केला अनिता श्रौती यांनी. निवेदक होत्या प्रज्ञा गोखले.

**दि. ६ जानेवारी २०१५ : रोजी निसर्ग अंताक्षरी** हा कार्यक्रम आयोजित केला होता. यामध्ये फक्त निसर्गावर आधारित मराठी व हिंदी गाणी सादर झाली. नाविन्यपूर्ण फेऱ्यांमुळे कार्यक्रमात रंगत आली.

**दि. १० जानेवारी २०१५ : मैत्रेयीचे २८ वे स्नेहसंमेलन** सकाळी ९.३० ते सायं. ६ या वेळेत संपन्न झाले. यामध्ये पुढील कार्यक्रम होते.

१) यावर्षीचा कै. प्रभावती पागे पुरस्कार मुलुंडमधील सुप्रसिध्द लेखिका व मैत्रेयीच्या माजी अध्यक्ष सुषमा केतकर यांना, मान्यवर लेखिका प्रतिभाताई गोपुजकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यावेळी सुषमाताई केतकर यांच्या कथेचे अभिवाचन व त्यांच्या बालगीतसंग्रहातील एका बडबडगीताचे सादरीकरण करण्यात आले. २) ब्रेक के बाद या कार्यक्रमात करियरमध्ये ब्रेक घेऊन त्यानंतरही यशाची उत्तुंग शिखरे सर करणाऱ्या करिअरिस्ट महिला - ट्रॅव्हल इंडस्ट्रीतील रेणुका नातू , आंतरराष्ट्रीय बिझिनेस संदर्भात कन्सलटंट म्हणून कार्यरत असणाऱ्या स्वप्ना नाईक व २६ वर्ष मुंबई महानगरपालिकेत नोकरी करून नंतर स्वतःची ट्रान्सलेशन एजन्सी सुरू करणाऱ्या सुप्रिया देशपांडे यांच्याशी प्रियांका मोकाशी यांनी संवाद साधला. मुलाखत अतिशय रंगतदार झाली. ३) दुपारच्या सत्रात अनुराधा फाटक, शुभदा सामंत व मुग्धा भागवत यांनी कै.साधनाताई आमटे यांच्या आत्मकथनावर आधारित समिधा हा कार्यक्रम सादर केला. ४) त्यानंतर सुप्रसिध्द कथ्थक नृत्यांगना रंजना फडके व सहकलाकार यांनी कथ्थक नृत्यावर आधारित प्रेमरंग हा कार्यक्रम सादर केला. वासंती वर्तक यांचे निवेदन अतिशय अभ्यासपूर्ण होते.

**दि. ३ फेब्रुवारी २०१५ : मुक्तसंवाद** या कार्यक्रमांतर्गत विविध विषयांवर मैत्रिणींनी आपले विचार मांडले.

**दि.१७ फेब्रुवारी २०१५ : वेचक - वेधक** या कार्यक्रमात सुप्रसिध्द संकलक भक्ती मायाळू यांच्याशी मेधा देव यांनी संवाद साधला. मुलाखत खूपच रंगतदार झाली.

**दि. ३ मार्च २०१५ : मुक्त - विमुक्त :** महिलादिनानिमित्त आयोजित या विशेष कार्यक्रमात भटक्या विमुक्तांसाठी काम करणाऱ्या ॲड. पल्लवी रेणके यांना आमंत्रित केले होते. त्यांचे अनुभवकथन सुन्न करणारे होते.

**दि.१७ मार्च २०१५ : रोजी अक्षरमैत्री** या उपक्रमांतर्गत फुलोरा हा माहितीपूर्ण व मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर झाला. या कार्यक्रमात स्वाती गुणे व कल्पना भावे यांनी काळानुरुप बदलत गेलेलं साहित्य, संगीत, विविध माध्यमे यांचा संगीतमय आढावा घेतला.

**दि. ७ एप्रिल २०१५ : रोजी मुक्तसंवाद** या कार्यक्रमात १) सोशल नेटवर्कींग व मी २) फसगत ३) दिनविशेष - महिला दिन, आरोग्यदिन यासारखे दिन आयोजित करण्यामागील प्रेरणा व उद्दिष्टे या विषयांवर मैत्रिणींनी आपले विचार मांडले.

**दि. १० एप्रिल २०१५ :** मैत्रेयीने **वासंतिक मेळाव्यात** ऋतुराज हा, नृत्य, संगीत, निसर्ग यांनी परिपूर्ण असा दृक्श्राव्य कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाची संकल्पना माधवी भुसारी यांची होती व लेखन रश्मी अनगळ यांचे होते. सादरीकरणात रश्मी अनगळ, नंदिनी हंबर्डे, सुषमा पाटणकर, वीणा नाटेकर, रजनी करंदीकर व हेमांगी फाटक यांचा सहभाग होता.

चित्तपावन ब्राह्मण संघातर्फे चैत्रगौरीची आरास ही स्पर्धा १४ एप्रिल रोजी आयोजित केली होती. 'देवीची पारंपारिक रूपे' हा विषय होता. या स्पर्धेत मैत्रेयीने सरस्वती देवीची आरास करून अंध व इतर अपंगांवर कृपादृष्टी ठेव अशी इच्छा प्रकट करणारा देखावा मांडला होता. मैत्रेयीतर्फे स्पर्धेत रश्मी अनगळ व नंदिनी हंबर्डे यांनी सहभाग घेतला.

प्रियांका मोकाशी, कार्यवाह — माधवी भुसारी, अध्यक्ष

***अभिप्राय :***

*महाराष्ट्र सेवा संघाचे संस्कृत-प्रेमी संमेलन २०१५ हा उपक्रम अतिशय स्तुत्य व प्रशंसनीय झाला. अगदी प्रारंभापासूनच कार्यक्रमाची उंची वाढत राहिली. उत्तम संयोजन, शिस्तबद्ध कार्यकर्ते, उत्तम वक्ते यामुळे आणि पं. प्रभाकर भातखंडे यांचा परिसस्पर्श यामुळे कार्यक्रमाचे सोने झाले. संस्कृतमातेचे हे सर्व सुपुत्र. तिला पुन्हा कीर्तिस्थानी स्थापित करतील हे निःसंशय!*

*संस्कृतं विजयते तराम्।*

*.....उमा वैद्य,*

*कुलगुरू, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक, (नागपूर)*

# कला विभाग



र. द. लाड - (अध्यक्ष),  वि.म.सौदागर (कार्यवाह)
सदस्य - चं.म. कुलकर्णी, प्रदीप नाटेकर, द.व. कुलकर्णी, अ.मो.भंडारे, स. श्री. पाटणकर, वि. स. जोशी, प्रकाश सडेकर, मेधा दिवेकर, सीमा केतकर, मुग्धा गोळे, श्रेयसी वझे-मंत्रवादी. सुषमा पाटणकर

या आर्थिक वर्षात कला विभागाने सादर केलेले कार्यक्रम पुढीलप्रमाणे,

**शनिवार, दि. १४ जून,२०१४ :-** पोलिसी वर्दी अंगावर असूनदेखील निसर्ग, दऱ्या-खोऱ्या, किल्ले, पर्वतराजींवर प्रेम करणारे गिर्यारोहक गिर्याप्रेमी अशा पोलिस अधिकाऱ्यांशी संवाद साधला म.टा. चे समीर कर्वे यांनी आणि गिर्यारोहण, गिरीभ्रमण या छंदाला ते कसे सामोरे जात आहेत ते जाणून घेतले. राजू पाटील, जयवंत दुखंडे, अरविंद पोळ, प्रकाश वाळवेकर, हेमंत राजे व ज्योत्स्ना सुर्वे यामध्ये सहभागी झाले होते.
**२९ जून,२०१४ :-** नृत्य, नाट्य, संगीत, वादन यांच्या माध्यमातून कर्नाटकातील लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणारा कलाप्रकार म्हणजेच 'यक्षगान'. मुंबईतील कुर्ला येथील 'जनप्रिया यक्षगान मंडळा'ने 'देवी माहात्म्य' हे आख्यान यक्षगानाच्या माध्यमातून सादर केले. आख्यानाचे माध्यम कन्नड असूनही कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळाला. 'कामत बॅन्क्वेट्स'चे श्री. दीपक बाळगी यांच्या सहकार्याने आपण हा आविष्कार सादर केला.
**१९ जुलै,२०१४ :-** कै. गंगाबाई लक्ष्मण महाबळ स्मृतिप्रीत्यर्थ कलाविभागाने 'वारी पंढरीची' हा संतरचनांचा कार्यक्रम सादर केला. प्रज्ञा गोखले यांनी सूत्रसंचालन आणि निवेदन केले. संतांचे प्रासादिक अभंग अजय रिसबूड, नीलिमा पुराणिक आणि सुरेखा जोशी यांनी सादर केले. यानंतर हरिपाठाचे अभंग सादर करण्यात आले. शेवटी रिंगण धरून विठूनामाचा गजर करीत कार्यक्रमाची सांगता झाली. रिंगणात नर्तनात सेवा संघातल्या सर्व वयोगटांतील वारकऱ्यांनी भाग घेतला.
**१५ ऑगस्ट,२०१४ :-** डॉ. उत्तरा चौसाळकर आणि आपल्या संस्थेचे पं. प्रदीप नाटेकर यांनी शास्त्रीय संगीताचा आस्वाद कसा घ्यावा हे अगदी सोप्या शब्दांत, सोदाहरण स्पष्ट करून सांगितले. शास्त्रीय संगीत बहुजनांपर्यंत पोहोचावे हा हेतू, हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन, कार्यक्रमांची एक श्रुंखला कला विभाग सादर करू इच्छितो. त्यामधील हे पहिले पुष्प!
**२३ ऑगस्ट,२०१४ :-** श्री दत्त संप्रदायाचे एक प्रमुख आधारस्तंभ प.पू. टेंबेस्वामी यांचे चरित्र आणि जीवनकार्य उलगडून दाखविणारा एक कार्यक्रम आपण सादर केला. टेंबेस्वामींचे चरित्र ११,००० ओव्यांच्या मदतीने सिद्ध करणारे डोंबिवलीचे एक साधक श्री. अशोक इंदुलकर यांनी टेंबेस्वामींचे कार्य समजावून सांगितले. इंदुलकरांच्या निरूपणानंतर टेंबेस्वामींची पदे सादर करण्यात आली.
**१८,१९,२० सप्टेंबर,२०१४ :-** दरवर्षीप्रमाणे या वर्षी कै. लक्ष्मणराव महाबळ पितृस्मृति व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती व या वर्षीचे वक्ते होते संत साहित्याचे अभ्यासक व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे. या तीनही दिवसांचा विषय होता 'एकविसाव्या शतकातील समाजसुधारक'
**८ ऑक्टोबर,२०१४ :-** प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व मॅनेजमेंट तज्ज्ञ डॉ.गिरीश जखोटिया यांच्या 'आक्रमण' कादंबरीचा लोकार्पण सोहळा. ही कादंबरी 'साकेत'प्रकाशनाने प्रकाशित केली आहे. या व्यतिरिक्त डॉ. जखोटिया यांचे या कादंबरीला अनुलक्षून 'जग आणि भ्रष्टाचार' या विषयावर व्याख्यान झाले.
**११ ऑक्टोबर,२०१४ :-** संस्थच्या 'एक कलाकार,एक संध्याकाळ' या कार्यक्रमांतर्गत बुजुर्ग गायक श्री. वसंत आजगावकर यांना सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी सौ. आमडेकर यांनी श्री. आजगावकरांची प्रकट मुलाखत घेत, त्यांच्या सांगीतिक कारकिर्दीचा आढावा घेतला व त्या ओघात श्री. आजगावकर यांनी त्यांची गाजलेली गीते व त्यांच्या संगीत-रचना सादर केल्या.
**२८ ऑक्टोबर,२०१४ :-** गिरिमित्रांतर्फे गिर्यारोहणावर आधारीत फिल्मोत्सव साजरा करण्यात आला. विविध, कठिण व आव्हानात्मक मोहिमांवर आधारित या सर्व फिल्म्स होत्या.
**२९ नोव्हेंबर, २०१४ :-** आपल्या भविषयाविषयी कुतूहल असणाऱ्यांसाठी व भविष्य शास्त्रावर विश्वास असणाऱ्या व नसणाऱ्यांसाठी 'राशीच्या गंमती-जमती व यशाची सूत्रे- संचित कुंडलीद्वारे' या विषयावर डॉ. विद्याधर घैसास यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.
**२४ जानेवारी,२०१५ :-** जगातील वेगवेगळ्या नामवंतांच्या आईविषयीचा कार्यक्रम. सादरकर्ते : सौ.मुग्धा गोळे, विनीता नातू, वैशाली

घांग्रेकर व श्री. चंद्रशेखर वझे.
**७ फेब्रुवारी,२०१५ :-** संस्थेचे केटरर 'कामत बॅन्क्वेट्स'चे श्री दीपक बाळगी यांच्या पुढाकाराने आयोजित 'हुन उदका धोटू' या कोंकणी नाटकाचा सुविहित प्रयोग सादर करण्यात आला.
याच प्रयोगाआधी ज्येष्ठ रंगकर्मी श्री. आत्माराम भेंडे यांचे निधन झाल्याने त्यांना श्रद्धांजली वाहाण्यात आली.
गोवास्थित लेखक महाबळेश्वर सैल यांना त्यांच्या 'तांडव' या कादंबरीसाठी 'महाराष्ट्र फाऊंडेशन, अमेरिका' चा पुरस्कार मिळाल्याबद्दल खास निमंत्रण देऊन सत्कार करण्यात आला.
**७ मार्च ,२०१५ :-** आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पूर्वसंध्येला संस्थेच्या एक सभासद व प्रसिद्ध नृत्यांगना सौ. मेधा दिवेकर व त्यांच्या विद्यार्थ्यांनी 'स्त्री परिक्रमा' हा बॅले सादर केला. या कार्यक्रमाला लक्षणीय उपस्थिती होती. सौ. दिवेकर यांनी न कार्यक्रम सादर करून प्रेक्षकांचे मनोरंजन केले, याबद्दल त्यांना धन्यवाद!
**१५ मार्च,२०१५ :-** संस्थेचे ज्येष्ठ सभासद , कवी व माजी विश्वस्त श्री. वसंत केतकर रचित 'गीत कृष्णायन' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. संगीत - शीला जोशी, गायक - नीलिमा पुराणिक, श्री. किशोर देशमुख, वीणा शुक्ल व अजित केतकर

विनोद सौदागर, कार्यवाह | रवींद्र लाड, अध्यक्ष

---

## स्वरझंकार संगीत महोत्सव



महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड व व्हायोलिन अकादमी पुणे ह्यांच्या संयुक्त विद्यमाने तीन 'स्वरझंकार महोत्सव 'आजवर संपन्न झाले होते. अभिजनांचा उत्तम प्रतिसाद लाभल्यामुळे यंदाही ४ था 'स्वरझंकार महोत्सव' साजरा झाला. कार्यक्रमाचा तपशील खालीलप्रमाणे:
शनिवार, दि.१७ जानेवारी २०१५ - सचिन पटवर्धन (सरोद) व मालिनी राजूरकर (गायन)
रविवार, १५ जानेवारी २०१५ - अमिता गोखले-पावगी (गायन) व पं. रोणू मुझुमदार (बासरी)

---

## महाराष्ट्रातील गिर्यारोहकांचे १३ वे गिरिमित्र संमेलन



सालाबादप्रमाणे यंदाचे गिरिमित्र संमेलन झोकात पार पडले. १३ व्या संमेलनाची मध्यवर्ती संकल्पना होती ''सह्याद्री वनखात्याचे योगदान''

आपण डोंगरवेडे सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यांत , कडे कपाऱ्यांत , गडकिल्ल्यांवर मुक्त निसर्गाचा निखळ आनंद घेत मनसोक्त भटकंती करत असतो, कोणी पक्षी, प्राणी निरीक्षणासाठी , तर कोणी गडकिल्ल्यांच्या इतिहासाचा मागोवा घेण्यासाठी,कोणी सह्याद्रितील सुळक्यांवर आरोहण करण्यासाठी, या कारणाने सह्याद्रिच्या अंतरंगातील जंगलाशी आपला संबंध येतो. या जंगलाच्या संरक्षणासाठी शासनाचे काय योगदान आहे. आपली सामाजिक बांधिलकी नागरिक या नात्याने काय येते यावर 'सह्याद्री - वनखात्याचे योगदान' वर आधारित संमेलन १२ व १३ जुलै २०१४ ला पार पडले. या करीता महाराष्ट्र शासनातर्फे प्रमुख अध्यक्ष श्री. प्रवीणसिंग परदेशी , प्रधान सचिव वन विभाग, महाराष्ट्र राज्य, उपस्थित होते.
मध्यवर्ती संकल्पना चर्चा सत्रात श्री. ए. एस. पाटील मुख्य वन संरक्षक - नाशिक - श्री.के.पी. सिंग - मुख्य वन संरक्षक - पुणे , श्री. एम . के. राव- मुख्य वन संरक्षक - कोल्हापूर, श्री. विकास गुप्ता मुख्य वन संरक्षक - संजय गांधी राष्ट्रीय उद्यान - बोरिवली. उपस्थित होते. त्यांनी शासन पातळीवर वन संरक्षणाची जबाबदारी , समस्या, मर्यादा आणि योगदानावर चर्चा केली. या संमेलनास ब्रम्हपुत्रा नदीच्या खोऱ्यांत राहून जंगल निर्माण करणारा जगप्रसिध्द 'फॉरेस्ट मॅन ऑफ आसाम - श्री. यादव पायेंगे' उपस्थित होता. त्याच्या अनुभव कथनाने सर्व गिर्यारोहकांनी संमेलन डोक्यावर घेतले.
दरवर्षी प्रमाणे गिरिमित्र पुरस्कार सन्मान खालील गिर्यारोहकांना देण्यात आला -

गिरिमित्र जीवन गौरव सन्मान - उष:प्रभा पागे
गिरिमित्र गिर्यारोहक सन्मान - संजय रांगणेकर आणि प्रसाद ढमाळ
गिरिमित्र गिर्यारोहक संस्थात्मक सन्मान - सुरेंद्र दिघे, धनंजय भगत, प्रकाश कामत,
नागपूर माऊंटेनियरिंग ट्रेक क्षितीज संस्था
गिरिमित्र शरद ओवळेकर सन्मान - श्री. अशोक पवार - पाटील ( शैलभ्रमर ) यांना
''सुळक्याकडून सुळक्याकडे'' या पुस्तकाला देण्यात आला.

हिमालयातील मकाळू शिखर मोहीम यशस्वी पार करणारे पुण्याचे गिरिप्रेमी श्री. उमेश झिरपे, आनंद माळी, आशिष माने, अजित ताटे, भूषण हर्षे यांचा सत्कार - सन्मान करण्यात येऊन त्यांच्या मोहीमेवर आधारित चित्रफीत, मुलाखतीचा कार्यक्रम झाला.
कलकत्याचे गिर्यारोहक श्री. बसंत सिंघा रॉय यांनी अन्नपूर्णा शिखर मोहीम पार केली होती, तसेच काराकोरम शोध मोहीम घेणारे श्री. दिव्येश आणि विनीता मुनी या दांपत्याचा ही सत्कार - सन्मान करण्यात आला.

दरवर्षीप्रमाणे छायाचित्र स्पर्धा, ट्रेकर्स, ब्लॉग स्पर्धा प्रश्न मंजूषा स्पर्धा , दृकश्राव्य सादरीकरण (फिल्म मेकिंग) स्पर्धा घेण्यात आल्या, त्यांना यथोचित पारितोषिके देण्यात आली.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून छायाचित्रकार केदार भट , सौमित्र पेंडसे, फिल्म डायरेक्टर श्री. रविंद्र आपटे , संतोष देवधर , संजय लोकरे, प्रसिद्ध पत्रकार श्री. समीर कर्वे, प्रकाश कामत यांनी काम पाहिले.

जंगल निर्माण करणारा माणूस श्री. जादव पायेंगे यांनी तब्बल साडेचारशे हेक्टर जमिनीवर तयार केलेल्या या एकमेवाव्दितीय मनुष्यनिर्मित अभयारण्यात आज चार वाघ, तीन गेंडे, शंभर हरणे, शेकडो माकडे , ससे, स्थलांतरित अनेक पक्षी , सव्वाशे जंगली हत्तींचा कळप यांचा माहितीपट आणि प्रत्यक्ष दर्शन झाल्यामुळे उपस्थित गिर्यारोहकांना हे संमेलन प्रेरणादायी ठरले.

अरुण भंडारे
संमेलन साहाय्यक

रविंद्र लाड
संमेलन साहाय्यक



## अर्थ विभाग

अजित ग. करंदीकर (अध्यक्ष), अ. पं. गोळे (कार्यवाह)
**सदस्य** - अमिता ठोसर, प्रकाश सडेकर ,विजय वा.वझे, अरुण भंडारे

अर्थ विभागाचे हे ६ वे वर्ष. अवघे जन अर्थसाक्षर करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन अर्थविभागाची स्थापना २००९ साली झाली. आतापर्यंतच्या मागील वर्षांवर नजर टाकली की सहजच जाणवतं की या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळतो आहे. या वर्षात अर्थ, कायदा, उद्योजक सन्मान या प्रकारे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. बहुतेक सर्व कार्यक्रम महिन्याच्या शेवटच्या रविवारी सकाळी १० ते १२ या वेळेत आयोजण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमांना 'महाराष्ट्र टाईम्स'चे माध्यम प्रायोजकत्व लाभले.

**२७ एप्रिल,२०१४ :-** भारताच्या सध्याच्या आर्थिक परिस्थितीबद्दल 'भारताचे अर्थकारण व वेध भविष्याचा' या विषयावर डॉ. अभिजित फडणीस यांचे व्याख्यान झाले. हा कार्यक्रम अत्यंत उद्‌बोधक झाला.

**२५ मे,२०१४ :-** सदर दिवशी 'गुंतवणूक व निवडणुकीनंतर पुढे काय ?' या विषयावर डॉ. अभिजित फडणीस यांचे व्याख्यान झाले. कार्यक्रम श्रोत्यांना खूपच आवडला.

**२२जून,२०१४ :-** भारताच्या राजकारणात मोठा बदल होऊन भारतीय जनता पक्षाचे सरकार स्थापन झाले व या नवीन सरकारचा पहिला अर्थसंकल्प सादर होणार होता. अर्थात् जनमानसामध्येदेखील नव्या सरकारकडून अपेक्षा होत्या. याच विषयावर 'अर्थसंकल्पाकडून अपेक्षा' या विषयावर डॉ. चंद्रहास देशपांडे यांचे भाषण अतिशय सुंदर व उद्‌बोधक झाले.

**२० जुलै,२०१४ :-** आजकालच्या जगात बहुतेक सर्वजण सहकारी गृहनिवासी संकुलांत राहातात. या अशा संस्थांना कोणकोणते कर लागू होतात याविषयी श्री. विजय जोशी व श्री. चंद्रशेखर वझे यांनी श्रोत्यांना उत्तम मार्गदर्शन केले. याच कार्यक्रमात प्राप्तीकर व सेवा कर यांविषयीही भाषणे झाली.

**२४ऑगस्ट,२०१४ :-** आजचे जीवन खूपच धकाधकीचे, धावपळीचे झाले असून काम वेळेत आणि व्यवस्थितपणे केले जावे याकरिता व्यवस्थापनाची खूपच जरुरी असते या विषयावर श्री. प्रकाश सडेकर यांचे 'वेळेचे व्यवस्थापन' या विषयावरचे व्याख्यान खूपच उत्तम झाले.

**२८ सप्टेंबर,२०१४ :-** आजच्या काळात स्त्रिया निरनिराळ्या व्यवसाय क्षेत्रात मोठी भरारी घेत आहेत. अशा ३ महिलांचा सत्कार व त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पांचा कार्यक्रम 'वेगळ्या वाटेने प्रवास करताना' करण्यात आला. या कार्यक्रमात श्रीमती श्रुती प्रभू -वैमानिक, जुईली भंडारे - मोनोरेल कॅप्टन, रसिका साठ्ये - विदेशी भाषा तज्ज्ञ या महिलांचा सत्कार करण्यात आला व त्यांच्याशी संवाद साधला अमिता ठोसर यांनी. कार्यक्रम अत्यंत सुंदर झाला व श्रोत्यांचा प्रतिसादही उत्तम होता.

**०२ नोव्हेंबर,२०१४ :-** आजकाल ग्राहकांना खूप अधिकार मिळाले असून याबाबत सरकारी यंत्रणेतून समाजप्रबोधन दूरदर्शनवर सातत्याने होत असते. तरीही ग्राहकांचे हक्क काय? तसेच जबाबदाऱ्या काय? याबाबत सविस्तरपणे विवेचन वक्ते श्री. विवेक पत्की यांनी केले व सर्व श्रोत्यांना मार्गदर्शन केले.

**२३ नोव्हेंबर,२०१४ :-** २६/११/२००८ रोजी मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला. सर्वसामान्य माणूस घाबरला. हा हल्ला कोणत्या संघटनेकडून झाला, पोलिस यंत्रणा अपयशी ठरली काय? याचा तपास कसा झाला व या घटनेतून काय बोध घ्यायचा याबाबत सविस्तर भाषण श्री. रमेश महाले, निवृत्त पोलिस अधिकारी यांचे झाले. कार्यक्रमातून सर्वसामान्य जनतेस या घटनेची संपूर्ण माहिती मिळाली.

**२८ डिसेंबर,२०१४ :-** औषधे हा सर्वसामान्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय. 'औषधांचे अर्थकारण' या विषयावर डॉ. मृदुला बेळे यांचा कार्यक्रम झाला. औषधांच्या किंमती कशा ठरतात, पेटंट म्हणजे काय व ते घेण्यासाठी काय प्रक्रिया करावी लागते. ब्रॅन्ड म्हणजे काय, त्याचे रजिस्ट्रेशन कसे करावे, जेनेरिक औषधे म्हणजे काय यासंबंधीची अत्यंत उपयुक्त माहिती वक्त्यांनी दिली.

**२५ जानेवारी,२०१५ :-** भारतीय जनता पक्षाचे सरकार स्थापन झाल्यानंतर पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी 'मेक इन इंडिया'ची घोषणा केली. 'मेक इन इंडिया'म्हणजे काय व ही घोषणा यशस्वी करण्यासाठी काय उपाययोजना करावी लागेल व कोणकोणत्या सेक्टरकडे जास्त लक्ष देणे आवश्यक आहे, याची सविस्तर माहिती डॉ. अभिजित फडणीस यांनी श्रोत्यांना दिली. कार्यक्रम अत्यंत माहितीपूर्ण व सुंदर झाला.

**२२ फेब्रुवारी, २०१५ :-** धर्मादाय संस्था या समाजासाठी काय करीत असतात, त्यामुळे त्यांच्याकडे पाहाण्याचा प्राप्तीकर खात्याचा दृष्टिकोन पूर्वी अतिशय सहानुभूतीपूर्ण होता. मात्र यात आता बदल झाला असून प्राप्तीकर आकारणी कशी केली जाते व कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी याबद्दल अत्यंत महत्त्वपूर्ण माहिती श्री. चंद्रशेखर वझे यांनी 'धर्मादाय संस्था व प्राप्तीकर' या विषयावरील भाषणात दिली.

**१५ मार्च,२०१५ :-** अर्थसंकल्प हा भारताच्या अर्थकारणात खूपच महत्त्वाची बाब आहे. सामान्य माणसाला प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष कर, निरनिराळ्या करसवलती यांबाबत नेहमीच उत्सुकता असते. नवीन आलेल्या सरकारने नियोजन आयोगाऐवजी 'विकासनीती'ची स्थापना केली आहे. ही 'नीती' काय आहे याबाबत डॉ. चंद्रहास देशपांडे व श्री. चंद्रशेखर वझे यांनी श्रोत्यांना आतिशय चांगली माहिती दिली.

या अर्थप्रबोधन व्याख्यानमालेतील १२ कार्यक्रमांव्यतिरिक्त दि.१८ मे २०१४ रोजी मी उद्योजक होणारच व २६ जुलै,२०१४ रोजी 'जाणून घेऊया अर्थसंकल्प' हा कार्यक्रम 'फोरम ऑफ फ्री एंटरप्राईसेस' व महाराष्ट्र सेवा संघाच्या संयुक्त विद्यमाने सादर झाला. तसेच दि.१ फेब्रुवारी,२०१५ रोजी 'केशव गणेश करंदीकर -उद्योगरत्न पुरस्कार प्रदान सोहळा' संपन्न झाला. यामध्ये 'प्रशांत कॉर्नर'चे श्री. प्रशांत सकपाळ, 'ट्यलिप हॉलिडेज'चे श्री. दिलीप यादव व 'सुरुची केटरर्स- डोंबिवली'च्या श्रीमती सुजाता परांजपे व श्रीमती भाग्यश्री प्रभुदेसाई यांना पुरस्कार देण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून 'निर्माण ग्रुप ऑफ कंपनीज' चे श्री . अजित मराठे लाभले होते.

अवधूत गोळे (कार्यवाह) अजित करंदीकर(अध्यक्ष)



# साहित्य सम्राट न.चिं. केळकर ग्रंथालय

नंदिनी हंबर्डे -अध्यक्ष, सुषमा पाटणकर– कार्यवाह, अ. मो. भंडारे - सहकार्यवाह

**सदस्य**

द.व कुलकर्णी, र. द. लाड, स. ग. पोतदार, वि. म. सौदागर , सुनीता देवधर, सुहास कराडकर, इंदिरा कुलकर्णी, मेधा देव

**१ मे २०१५** रोजी ३७ व्या वर्षात पदार्पण केलेले हे ग्रंथालय पूर्णपणे संगणकीकृत असे सुसज्ज ग्रंथालय आहे. अनेक संदर्भ आणि दुर्मीळ पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध आहेत.

वर्षभरात ग्रंथालयाने विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

**२३ एप्रिल,२०१४ :- जागतिक पुस्तक दिन** साजरा करण्यात आला. २३ एप्रिल हा शेक्सपिअर यांचा जन्मदिन व मृत्यूदिनही! असा दुहेरी महत्त्वाचा दिवस असल्याने २३ एप्रिल हा 'जागतिक ग्रंथदिन' म्हणून साजरा केला जावा असे इंटरनॅशनल काँग्रेसने ठरविले. या कार्यक्रमात सहकार्यवाह अरुण भंडारे यांनी असे सांगितले की, दर्जेदार लिखाण वाचण्यासाठी आजचे वाचकही आसुसले आहेत. जगाच्या प्रगतीत जे सशक्त आहे आणि सकस आहे तेच टिकते हा निसर्गनियम आहे.

**२६ एप्रिल,२०१४ :- 'लेखक आपल्या भेटीला'** या कार्यक्रमांतर्गत द.व.कुलकर्णी, माधुरी कुंटे आणि गुरूनाथ तेंडुलकर हे लेखक आपल्या पुस्तकांसह उपस्थित होते. गप्पांगण, हिरवी पालवी, टेक्नॉलॉजी ऑलवेज विन्स, 'शब्द अमृताचे' या पुस्तकांचे प्रकाशन सुमेध वडावाला यांचे हस्ते झाले. याप्रसंगी प्रसिद्ध लेखक भा. ल.महाबळ, समीरा गुजर, साहाय्यक पोलिस आयुक्त (वाहतूक) नंदकुमार मिस्त्री यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

**१ मे ते ४ मे,२०१४ :- 'वसंत व्याख्यानमाला'** - न.चिं केळकर ग्रंथालय, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय-मुलुंड (पू.), ग.क.खांडेकर वाचनालय/ग्रंथालय या तीनही ग्रंथालयांच्या संयुक्त विद्यमाने वसंत व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये नरेंद्र पाठक यांचे 'प्रश्न तुमचे-उत्तर आमचे', श.प. पटवर्धन यांचे 'शून्योपचार' , एकनाथ बागुल यांचे 'संपादकाच्या खुर्चीतून' आणि शुभदा दादरकर यांचे 'संगीत रंगभूमी -काल,आज आणि उद्या' अशी दर्जेदार व्याख्याने झाली.

**६ मे,२०१४ :-** 'बालमैफल' हा कार्यक्रम मुलांनी सादर केला. दुपारी १ ते ६ या वेळेत वय-वर्ष ५ ते १४ या गटातील मुले -मुली उपस्थित होत्या. मुलांच्या मनोरंजनासाठी जादूचे प्रयोग, गाणी-गोष्टी याबरोबरच खाऊ आणि आईसक्रिम असा भरगच्च बेत होता.

**१५ सप्टेंबर,२०१४ : गंगाधर गाडगीळ स्मृती कार्यक्रम** - न.चिं. केळकर ग्रंथालय आणि पॉप्युलर प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम करण्यात आला. कमलाकर सोनटक्के यांच्या हस्ते गंगाधर गाडगीळ यांच्या 'पाळणा', 'खरं सांगायचं म्हणजे', 'कबुतरे' आणि 'वर्षा' या चार कथासंग्रहांचे प्रकाशन करण्यात आले. स्नेहा देऊसकर यांनी गंगाधर गाडगीळ यांच्या कथांवर चर्चा केली.

**१७सप्टेंबर,२०१४ :-** लोकमान्य इंग्लिश मिडियमच्या १६ विद्यार्थ्यांनी 'दृष्टिसेवा'च्या विद्यार्थ्यांना दिवसभर खेळ, गाणी, मेडिटेशन, शारीरिक शिक्षण यांद्वारे मुलांचे वैचारिक मनोरंजन केले. दैनंदिन जीवनात थोडे वेगळेपण येण्यासाठी असे उपक्रम राबविण्यात येतात.

**१ऑक्टोबर,२०१४ :-** सुप्रसिद्ध लेखिका डॉ. विजया वाड यांच्या १००व्या पुस्तक प्रकाशनाचे निमित्त साधून डॉ. विजया वाड यांच्या 'वेधक' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाला रोहिणी हट्टंगडी, निशिगंधा वाड, अशोक मुळे, विलास खोले, भा.ल. महाबळ इ. मान्यवर उपस्थित होते.

**६ ऑक्टोबर,२०१४ :-** सुप्रसिद्ध कवी शंकर वैद्य यांचे दि.२३ सप्टेंबर,२०१४ रोजी निधन झाले. त्यांना 'वाचक संवाद'या उपक्रमांतर्गत श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी झालेल्या कार्यक्रमात त्यांच्या काही कवितांचे वाचन करण्यात आले.

**१३ ऑक्टोबर,२०१४ :-** प्रसिद्ध इतिहासकार **सेतुमाधवराव पगडी स्मृती व्याख्यान** आयोजित करण्यात आले होते. श्री. मुरलीधर मुळुंदकर यांना व्याख्याते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. सेतुमाधवराव पगडी यांना 'फारसी'भाषा अवगत होती आणि श्री. मुळुंदकर हेही १९ व्या शतकातील 'फारसी'वृत्तपत्रे आणि इतर लिखाणाचा अभ्यास करीत आहेत.त्यांच्या व्याख्यानाचा विषयही तोच होता.

**७ डिसेंबर,२०१४ :- 'गीतारहस्य'** या लोकमान्य टिळकांनी मंडालेच्या तुरुंगात लिहिलेल्या ग्रंथाला जून २०१५ मध्ये १०० वर्षे पूर्ण झाली ज्येष्ठ पंचांगकर्ते श्री. दा.कृ.सोमण यांनी त्यानिमित्त या ग्रंथावर १०० व्याख्याने देण्याचा संकल्प सोडला होता. त्यानिमित्त त्यांना व्याख्यान देण्यासाठी आमंत्रित केले होते.

**२१ डिसेंबर,२०१४ :- 'विशेष वाचक संवाद'** या अंतर्गत श्री. राजाराम व्हनमाने- मुलुंड पोलिस स्टेशन (प.) चे वरिष्ठ पोलिस

निरीक्षक यांना आमंत्रित करण्यात आले होते. ज्येष्ठ नागरिकांना लुटणे, प्रसंगी त्यांच्यावर कौटुंबिक अत्याचार, छळ असे प्रकार आपल्याला ऐकायला येतात. तसेच महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र खेचणे, शालेय आणि महाविद्यालयीन तरुण मुले व्यसनांच्या विळख्यात सापडणे या व अशा संकटांचा मुकाबला आपण कसा करायचे याविषयी उपयुक्त संवाद साधण्यात आला.

**१० जानेवारी,२०१५ :-** मुलुंडमधील तिन्ही ग्रंथालयांच्या सभासदांची सहल अंबामाता आदिवासी आश्रम- अंबिस्ते येथे नेण्यात आली होती.

**२७ फेब्रुवारी ,२०१५ :- 'साहित्य साधना पुरस्कार'** - ग्रंथालयाच्या दृष्टिने अत्यंत मानाचा समजला जाणारा 'साहित्य साधना पुरस्कार' -वर्ष १० वे. दलित साहित्य या विषयात यंदा हा पुरस्कार डॉ. इसादास भडके यांना त्यांच्या 'गन गन भोवरी' या पुस्तकाला देण्यात आला.

**२ मार्च, २०१५ :- 'यात्रा माझ्या सभोवतालची'** या विषयावर बोलण्यासाठी रेल्वे इंजिन ड्रायव्हर/ मोटरमन श्री. गणेश मनोहर कुलकर्णी यांना आमंत्रित केले होते. हजारो प्रवाशांची ने-आण करतांना काही विलक्षण अनुभव येतात. रेल्वे ड्रायव्हर असल्यामुळे रानावनांतून, डोंगर-दऱ्यांतून, पूल व नद्या यांवरून रेल्वे जात असताना निसर्गाचे विलोभनीय दर्शन होते. निसर्ग कसा अनुभवावा हे त्यांनी खूप चांगल्या पद्धतीने सांगितले.

**२६ ते २८ मार्च, २०१५ :-** या तीन दिवसांत न.चिं.केळकर ग्रंथालय आणि पॉप्युलर प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने **'प्रिय रसिक'** हा साहित्यिक कार्यक्रम संपन्न झाला. २६ मार्च रोजी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते श्री. भालचंद्र नेमाडे यांना 'प्रिय रसिक'चे पहिले पुष्प गुंफण्यास आमंत्रित केले गेले होते. डॉ. अरुणा दुभाषी यांनी अतिशय नेटकेपणाने समर्पक प्रश्न विचारून त्यांना बोलते केले.

२७ मार्च रोजी श्री. देवदत्त पट्टनायक यांची मुलाखत श्री. हर्ष भटकळ यांनी घेतली. श्री. पट्टनायक यांच्या 'शिवाची सात रहस्ये', 'विष्णूची सात रहस्ये' आणि 'जय' या तीन पुस्तकांचे प्रकाशनही करण्यात आले.

२८ मार्च रोजी 'प्रिय रसिक' चे तिसरे पुष्प गुंफण्यात आले. विषय -'पुस्तकांची बदलती मुखपृष्ठे' या विषयावर व्याख्यान देण्यासाठी सर्वश्री. सतीश भावसार, अनंत खासबारदार, शिरीष खांडेकर व रामदास भटकळ यांनी सहभाग घेतला. मुखपृष्ठ हे विषयाशी संबंधित व आकर्षक असावे. वाचकाला त्यामुळे आनंद मिळाला पाहिजे. सुंदर मुखपृष्ठांचे सादरीकरण करण्यात आले.

अहवालवर्षामध्ये ३० जानेवारी,२०१५ ते १० फेब्रुवारी,२०१५ या कालावधीत ग्रंथालयाचे नूतनीकरण करण्यात आले. त्यानंतर बदललेल्या रचनेमुळे कर्मचारी वर्ग आणि ग्रंथालयाचे वाचक यांना फार सोयीचे झाले आहे.

ग्रंथालयात क्लोज सर्किट टीव्ही. कॅमेरे बसविण्यात आल्यामुळे कामकाजास अधिक शिस्त आली आहे.

महाराष्ट्र सेवा संघाच्या विश्वस्त , कार्यकारी मंडळ, सभासद आणि ग्रंथालयाच्या वाचकांकडून व कर्मचाऱ्यांकडून मिळालेल्या सहकार्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत!

सुषमा पाटणकर — कार्यवाह

नंदिनी हंबर्डे — अध्यक्ष

***अभिप्राय :***

*महाराष्ट्र सेवा संघ के सभी पदाधिकारीओ ने बहुत उत्साह एवं प्रयत्नोंसे नेत्र सुरक्षा के बारे में सूर्या आई हॉस्पिटल के डायरेक्टर डॉ. विनोद गोयल का एक संवाद आयोजित किया।*

*दी गयी जानकारी से यदी एक मरीज की एक भी आँख की रोशनी को बचाया जा सका तो आयोजन पूर्णतः सफल माना जायेगा।*

*शुभेच्छा सहित।*

*.....डॉ. विनोद गोयल*

Braille

# दृष्टिसेवा अभ्यासिका

दृष्टिसेवा केंद्राचे २०१४-१५ हे तिसरे शैक्षणिक वर्ष. वर्षाची सुरुवात १६ जून,२०१४ रोजी झाली. एकूण २० विद्यार्थ्यांनी अभ्यासिकेत प्रवेश घेतला. वर्षाच्या सुरुवातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षक व मदतनीसांचा सत्कार करण्यासाठी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. १५ जुलै २०१४ रोजी, मार्च २०१४ मध्ये झालेल्या शालान्त परिक्षेत केंद्राला १००टक्के निकालाचे यश मिळवून देणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संस्थेचे विश्वस्त, ॲडव्होकेट श्री. अजित करंदीकर यांच्या अध्यक्षतेत पार पडला.

मुलुंड विद्या मंदिर शाळेच्या वार्षिक महोत्सवात व इनर व्हील क्लब, मुलुंड यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात दृष्टिसेवा केंद्राच्या विद्यार्थ्यांना गाण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आपला सहभाग यशस्वीपणे पार पाडला. तीळगूळ समारंभ, रक्षाबंधन यांसारख्या कार्यक्रमांतही विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला.

'नॅब'च्या 'क्लायंट सर्व्हिस'तर्फे विद्यार्थ्यांना MP3 players भेट देण्यात आले. 'लोकमान्य टिळक इंग्लिश हायस्कूल'च्या विद्यार्थ्यांनी दृष्टिसेवेच्या विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळा घेतली. त्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी आपल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. होस्टेलमध्ये राहाणाऱ्या विद्यार्थ्यांना दृष्टिसेवेतर्फे पूर्ण वर्षभर मध्यान्ह भोजन देण्यात आले.

२९ जानेवारी,२०१५ रोजी विद्यार्थ्यांची सहल डॉ. मेघना म्हसकर यांच्या मुरबाड जवळील 'विसावा' रिसॉर्टमध्ये नेण्यात आली. तेथील धाडसी खेळांमधील विद्यार्थ्यांचा सहभाग कौतुकास्पद होता. विद्यार्थ्यांसाठी डॉ. म्हसकर यांनी कोणतेही शुल्क आकारले नाही.सहलीसाठी बसची व्यवस्था 'इनर व्हील क्लब ऑफ मुलुंड हिल्स' ने केली होती.

पहिल्या सत्रामध्ये १० ते १७ ऑक्टोबर या काळात सत्र-परीक्षा घेण्यात आली. दुसऱ्या सत्रातील सराव परीक्षा ३ ते १५ फेब्रुवारी,२०१५ या काळात 'मुलुंड विद्या मंदिर' येथे शालान्त परीक्षेच्या धर्तीवर घेण्यात आली.

यंदाच्या शैक्षणिक वर्षातील विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे दृष्टिसेवेच्या मराठी माध्यमाच्या सर्व विद्यार्थ्यांना शालान्त परीक्षेसाठी 'मुलुंड विद्या मंदिर' हे केंद्र मिळविण्यात आलेले यश! या कामी 'बॅरिस्टर नाथ पै' व 'मुलुंड विद्या मंदिर' या शाळांचे मोलाचे सहकार्य मिळाले. विद्यार्थ्यांसाठी लेखनिक म्हणून 'मुलुंड विद्या मंदिर' व 'लोकमान्य टिळक विद्यालय'च्या विद्यार्थ्यांनी काम केले.

या शैक्षणिक वर्षात दृष्टिसेवेला एकूण रु.३,५२,९१४/- देणगीरूपाने मिळाले. ही रक्कम महाराष्ट्र सेवा संघाकडे सुपुर्द करण्यात आली.

दृष्टिसेवा केंद्र सर्व शिक्षक, मदतनीस व देणगीदार यांचे आभारी आहे. केंद्रावर असाच लोभ असावा ही विनंती.

रश्मी अनगळ , कार्यवाह — सुनीता देवधर, अध्यक्ष

***अभिप्राय :***

*माझ्यापेक्षा ज्येष्ठ महाराष्ट्र सेवा संघाबद्दल माझा आदर दोन भेटींमध्ये वाढला. इतके नेमके नेमस्त आणि योजनाबद्ध काम विरळाच बघायला मिळते. परत यायचे निमित्त शोधलेच आहे.*

*'अस्तु' (असो!)*

*.....मोहन आगाशे, १ मार्च,२०१५*

***अभिप्राय :***

*न.चिं. केळकर ग्रंथालयाला आज २० वर्षांनी पुन्हा भेट दिल्याचा आनंद या अभिप्रायात व्यक्त करण्याचा प्रयत्न करीत आहे. अनेक वर्षांची परंपरा असलेल्या या ग्रंथालयाचा सेवकवर्ग पुस्तकप्रेमी असल्याचे येथील संग्रहावरून सिद्ध होते. मुंबई परिसरात वाचन संस्कृती वाढविण्यात येथील सर्व व्यक्तींचा मोठा सहभाग आहे. मी ग्रंथालयाला शुभेच्छा देतो.*

*..... ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त लेखक डॉ. भालचंद्र नेमाडे,*
*२६ मार्च,२०१५*




# विज्ञान विभाग

(विज्ञान प्रेमींचा मंच)

अध्यक्ष - द.व. कुलकर्णी , कार्यवाह - स. श्री. पाटणकर

सदस्य - मिलिंद काळे, प्रकाश सडेकर, नितीन देशपांडे, स्मिता जोशी

विशेष सहभाग : अरुण भंडारे, रवींद्र लाड, सीमा केतकर, संतोष नवाथे

विज्ञान कथाकार आणि साहित्यिक श्री. निरंजन घाटे यांना जानेवारी,२०१४ मध्ये सु.ल. गद्रे साहित्यिक पुरस्कार देण्यात आला. या निमित्तानेच अध्यक्ष श्री. चंद्रशेखर वझे यांच्या प्रेरणेने महाराष्ट्र सेवा संघाचा स्वतंत्र विज्ञान विभाग सुरू झाला आणि बघता बघता एका वर्षात विज्ञान विभागाने अनेक अनोखे कार्यक्रम सादर केले.

विद्यान-तंत्रज्ञान हे आजच्या आयुष्याचा इतका अविभाज्य भाग झाला आहे की लहान थोरांना त्याच्या जाणीवपूर्ण वापरासाठी जितकं प्रबोधन करता येईल तितकं हवंच आहे. हा दृष्टिकोन ठेवून मूलभूत गणित-विज्ञानापासून अगदी रोजच्या वापरातील स्मार्ट फोनपर्यंतचे विषय ह्या विभागाने हाताळले आणि यापुढेही सातत्याने वेगवेगळ्या स्वरूपात बहुस्पर्शी उपक्रम आणि कार्यक्रम राबविण्याचा विभागाचा निश्चय आहे. आरोग्य, संगीत, भाषा, साहित्य, स्थापत्य, तांत्रिक उपकरणे, कृषी, उर्जा व्यवस्थापन, खगोलशास्त्र असे रोजच्या जगण्यापासून कल्पनेपलीकडच्या विश्वापर्यंतचे सर्वव्यापी विज्ञान विषय विज्ञानप्रेमींपर्यंत पोहोचविणे आणि ह्या प्रक्रियेत आपणही अधिक सुजाण व व्यापक होणे हे या विभागाचे ध्येय आहे. तरुण आणि उत्साही कार्यकर्त्यांची कुमक बांधण्याचे उद्दिष्टही ह्याप्रकारे साध्य करता येईल असाही विश्वास समितीला वाटतो. विज्ञानाचे, तर्कबुद्धीचे मुख्य आश्रयस्थान असलेल्या डाव्या मेंदूला प्राधान्य देणारे चिन्ह विभागाचे बोधचिन्ह म्हणून ठरविण्यात आले. सादर करण्यात आलेले कार्यक्रम / उपक्रम पुढील प्रमाणे

**१२ एप्रिल,२०१४ :-** विज्ञानकथा वाचन आणि या साहित्यप्रकारावर चर्चा.

**१७ मे,२०१४ :-** 'गणिताची वैज्ञानिक ओळख' या विषयावर तज्ज्ञांशी चर्चा. (गणितातील मूलभूत संकल्पना आणि त्यानुसार विविध शाखांची उभारणी समजून घेण्याचा प्रयत्न)

**१० ऑक्टोबर,२०१४ :-** 'मंगळयान' या कार्यक्रमात भारताच्या दैदिप्यमान अवकाश झेपेबद्दल अद्ययावत् माहिती, तीही मंगळस्वारीमध्ये प्रत्यक्ष हातभार लावणाऱ्या व्यक्तींकडून.



**२८ फेब्रुवारी,२०१५ :-** 'राष्ट्रीय विज्ञान दिना'निमित्त शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक प्रयोगांची अनोखी स्पर्धा आणि रोजच्या वापरातील वस्तुंमधून वैज्ञानिक संकल्पना जनसामान्यांना उलगडून दाखविणारे जाहीर प्रयोग. या कार्यक्रमासाठी श्री. प्रकाश सडेकर यांनी रु.१०,०००/-ची देणगी दिली.



**२८ मार्च,२०१५ :-** 'गो स्मार्ट' हा आंतरजाल आणि सेलफोनचा प्रभावी वापर करण्यासाठी जनसामान्यांना मार्गदर्शन करणारा अतिशय उद्बोधक आणि रंजक कार्यक्रम.

**२५ एप्रिल,२०१५ :-** 'निवडक धनंजय विज्ञानकथा' ह्या राजेंद्र प्रकाशनाच्या पुस्तकाचे प्रकाशन आणि डॉ. बाळ फोंडके यांच्याशी विज्ञानप्रेमींसाठी विज्ञानगप्पांचा कार्यक्रम

**९ मे,२०१५ :-** सौरउर्जेवर आधारित सेलफोन चार्जर बनविण्यासाठी कार्यशाळा. सहभागी व्यक्तींनी स्वतःसाठी चार्जर बनविला. त्याचबरोबर सौर उर्जेतील तज्ज्ञांनी जनसामान्यांना या विषयाची भारतासंदर्भात एकूण प्रगती आणि भवितव्य यांची माहिती दिली.



# ज्ञानेश्वर पुस्तक पेढी

आर्थिक दृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकांच्या स्वरूपात मदत करण्याचे कार्य यावर्षीही महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड या आपल्या संस्थेने सुरू ठेवले आहे. याचाच भाग म्हणून संस्थेने २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात मुलुंड येथील विद्यार्थ्यांसाठी ९ वी चे २४ आणि १० वी चे ४३ विद्यार्थी असे एकूण ६७ जणांना शालेय पुस्तके वाटण्यात आली.

प्रदीप वाईकर, उमेश काणेकर ,सेवक                    अलका चौधरी, ग्रंथपाल

## साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय - ग्रंथस्थिती

| **वर्षातील नवीन ग्रंथ खरेदी** | **वर्षात देणगी दाखल मिळालेले ग्रंथ** | **एकूण** |
|---|---|---|
| ३६३ | ४३९ | ८०२ |

३१-३-२०१५ रोजी उपलब्ध ग्रंथ - ३४,११८

अहवाल वर्षात ७७,५३१/- रुपये किमतीची ग्रंथखरेदी करण्यात आली.

**ग्रंथालय सभासद तपशील**

| **३१-३-२०१५ अखेर सभासद** | विशेष सभासद | बाल विभाग | ग्रंथ विभाग |
|---|---|---|---|
| | १६८ | ४० | ५७१ |
| | अंक विभाग | सन्माननीय सदस्य | एकूण सदस्य |
| | २०२ | ३ | ९८४ |

**ग्रंथालयात दरमहा येणाऱ्या अंक, मासिके व साप्ताहिके यांचा तपशील**

| **प्रकार** | **मासिके** | **त्रैमासिके** | **पाक्षिके** | **साप्ताहिके** |
|---|---|---|---|---|
| मराठी | ६० | १४ | ३ | ९ |
| हिंदी | ८ | - | ४ | - |
| इंग्रजी | ३१ | - | ८ | १२ |
| एकूण | ९९ | १४ | १५ | २१ |

**दिवाळी अंक योजना २०१४-१०१५**

| | |
|---|---|
| सभासद संख्या | २२२ |
| अंकाचे प्रकार | १०९ |
| अंकांच्या एकूण प्रती | २५२ |
| खरेदी किंमत रुपये | २१,८९२/- |

**मोफत वाचनालयासाठी घेण्यात येणारी वृत्तपत्रे**

| प्रकार | संख्या | नाव |
|---|---|---|
| मराठी | ११ | महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, नवशक्ती, नवाकाळ, सकाळ, सामना, लोकमत, रत्नागिरी टाईम्स, सनातन प्रभात, प्रहार |
| हिंदी | २ | नवभारत टाईम्स, नवभारत |
| इंग्रजी | ७ | टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, फ्री प्रेस जर्नल, इकॉनॉमिक टाईम्स, एशियन एज, हिंदुस्थान टाईम्स, डी.एन्. ए. |
| गुजराथी | २ | मुंबई समाचार, गुजराथी समाचार |

**सायंदैनिके**

| **प्रकार** | **संख्या** | **नाव** |
|---|---|---|
| मराठी | २ | महानगर, संध्यानंद |
| हिंदी | १ | सामना |
| इंग्रजी | २ | आफ्टरनून, मिड-डे |

# ऐरोली शाखा

डॉ. आनंद रा. कट्टी - अध्यक्ष , श्री. प्रदीप र. सप्रे - उपाध्यक्ष, श्री. शंकर गो. वीरकर - कार्यवाह, श्री. सुधीर वा. बागाईतकर - कोषाध्यक्ष, सौ. अंजली कि. पेंढरकर (सहकोषाध्यक्ष)
**सदस्य :** श्री. चं. ना. वझे (पदसिद्ध), श्री. जयप्रकाश बर्वे (पदसिद्ध) , श्री. कि.म. पेंढरकर, श्री. मु. शं. बालंखे , श्री. वि. दा. जगताप, सौ. सुनीता देवधर, सौ. आरती सप्रे, सौ. दर्शना निमसे, श्री. निनाद जोशी, अनिल कुऱ्हेकर, सौ. प्रीती देशपांडे

नमस्कार!
२०१४-१५ सालचा ऐरोली शाखेचा अहवाल सादर करण्यास कार्यकारिणीला अत्यंत आनंद होत आहे. संस्थेच्या कार्याशी अधिकाधीक लोकांना जोडण्याच्या भूमिकेतून यावर्षी ऐरोली कार्यकारणीमध्ये काही नवीन सदस्यांना स्थान देण्यात आले.विस्तारित समितीच्या माध्यमातून, संस्थेच्या ध्ययधोरणानुसार ऐरोली शाखेची वाटचाल उत्तम प्रकारे सुरू आहे.
अपरंपारिक शिक्षणाच्या चळवळीतून सुजाण व सुसंस्कृत नागरिक बनविण्याचा वसा घेतलेल्या शाखेच्या ग्रंथालयाने, आपल्या वाचनसंस्कृतीचा परीघ वाढवला व यावर्षी ५५० सदस्यांचा टप्पा ओलांडला. या ग्रंथालयाच्या नामकरण सोहळ्याने या वर्षीच्या कार्यक्रमांची सुरुवात झाली. ग्रंथालयाचे 'सौ. सुनीता म. देवधर ग्रंथालय' असे नामकरण करण्यात आले. यानिमित्त आयोजित केलेल्या सोहळ्यामध्ये संस्थच्या कार्यामध्ये सातत्यपूर्ण व सर्वंकष योगदान दिल्याबद्दल सौ. सुनीता मधुकर देवधर यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त व ऐरोली शाखेचे माजी अध्यक्ष श्री. म.बा. देवधर यांनी लिहिलेल्या 'नशासूराचे विश्वव्यापी थैमान' या पुस्तिकेच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध शल्यचिकित्सक व रोटरी क्लबचे माजी जिल्हा प्रांतपाल डॉ. बाळकृष्ण इनामदार हे प्रमुख पाहुणे या नात्याने उपस्थित होते तर 'झी २४ तास' वाहिनीचे संचालक डॉ. उदय निरगुडकर हे विशेष अतिथी या नात्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात श्री. द.व. कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून उतरलेल्या 'मानसीचा चित्रकार तो' हा कविवर्य पी. सावळाराम यांच्या गीतांवर आधारीत कार्यक्रम सादर करण्यात आला. याच महिन्यात शाखेचा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. वर्धापनदिनानिमित्तचा कार्यक्रम हा वेगळ्या अंगाने जाणारा होता. पूर्णपणे शास्त्रीय गाण्यावर आधारित असलेला हा कार्यक्रम सौ. आरती अंकलीकर-टिकेकर यांनी सादर केला. लोकांची बदलती आवड व विविध दूरदर्शन वाहिन्यांवरून सुरू असलेला नवसंगीताचा धडाका, यामुळे कार्यक्रमास श्रोत्यांचा प्रतिसाद कसा लाभतो याबाबत कार्यकारिणी साशंक होती. परंतु वर्धापनदिन कार्यक्रम आणि रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हे गेल्या अनेक वर्षांपासून पक्क्या होत गेलेल्या समीकरणाप्रमाणे याही वर्षी सुखद अनुभव आला. अगदी पनवेलसारख्या दूरगामी भागातूनही रसिकांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली हे विशेष!

विद्यार्थी गुणगौरव व ज्येष्ठ शिक्षक सन्मान सोहळा हे कार्यक्रम नेहमीच्या उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमाला ज्येष्ठ शिक्षक व वक्ते श्री. बाळकृष्ण भागवत प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. या कार्यक्रमात ऐरोली परिसरातील ३२ विद्यार्थी आणि १२ शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. बदलत्या जगात नवी आव्हाने स्वीकारण्यासाठी योग्य शिक्षकच विद्यार्थ्यांना कसे तारू शकतील यावर त्यांनी व्यक्त केलेले विचार विद्यार्थ्यांना भावून गेले.

'दिवाळी पहाट' हा संस्थेतर्फे सादर होणारा आणखी एक महत्त्वाचा कार्यक्रम. अवघ्या महाराष्ट्राचं सांस्कृतिक संचित म्हणून गौरविलेल्या 'गीत रामायण' या महाकाव्याच्या हीरक महोत्सवानिमित्त त्यातील अवीट गोडीच्या निवडक गीतांचा कार्यक्रम दिवाळी पहाटेच्या प्रसंगी सादर केला गेला. अमित नेसरीकर यांचा थेट हृदयाला भिडणारा प्रत्ययकारी स्वर आणि संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर वझे यांचे अभ्यासपूर्ण आणि लालित्यपूर्ण निरूपण यांतून रंगलेला हा कार्यक्रम रसिकांना मंत्रमुग्ध करणारा होता. कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद लाभला.

कलाविभाग, मैत्री महिला विभाग, ग्रंथालय हे उपक्रम उत्तम कार्य करीत असून त्यांचे अहवाल स्वतंत्र जोडले आहेत. या सर्वांचे मिळून वर्षभरात सुमारे ३५ दर्जेदार आणि वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम सादर केले जातात. 'मैत्री'ला यावर्षी १० वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्त प्रकाशित केलेल्या स्मरणिकेत अनेक विचारवंतांनी आपले लेख सादर केले आहेत.

याव्यतिरिक्त श्री.अच्युतमहाराज सत्संग मंडळातर्फे प.पू.श्री.जीतेंद्रनाथजी महाराज यांच्या प्रासादिक वाणीतून सादर केला जाणारा 'भागवत्' सप्ताह हा विशेष कार्यक्रम संयक्त विद्यमाने साजरा केला जातो. ऐरोली अवयवदान प्रसारक मंडळ तसेच ऐरोली परिसरातील इतर सेवाभावी संस्था यांनीही ऐरोली शाखेच्या कार्यात सहकार्याचा हात पुढे केला आहे. थोडक्यात म्हणजे ऐरोली शाखेमध्ये आल्यानंतर कुठूनही आलेल्या सांस्कृतिक पांथस्थाला स्वगृही आल्याचे समाधान मिळेल असेच शाखेचे कार्य सुरू आहे.

अभ्यासिका हा ऐरोली शाखेचा एक यशस्वी उपक्रम! अनेक कारणांमुळे विद्यार्थ्यांना स्वतःच्या घरांमध्ये अभ्यास करणे शक्य नसते, ही अडचण लक्षात घेऊन संस्थेतर्फे सुमारे ११ वर्षांपूर्वी अभ्यासिका सुरू करण्यात आली. विविध अभ्यासक्रमांमध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या तसेच सरकारी, लोकसेवा तसेच पोलिस सेवांतील सुमारे ७,५०० विद्यार्थ्यांनी आजपावेतो अभ्यासिकेचा लाभ घेतला आहे. पनवेलपासून मस्जिदपर्यंतचे विद्यार्थी अभ्यासिकेचे सदस्य आहेत.

ग्रंथालयासाठी अधिक जागेची गरज लक्षात घेऊन, ग्रंथालय, कार्यालय व कॉन्फरन्स रूम यांची पुनर्रचना करून ग्रंथालयासाठी जास्त जागा उपलब्ध करून देण्यात आली. संस्थेच्या इमारतीच्या नूतनीकरणाची गरज असून निधीच्या उपलब्धतेनुसार ते टप्प्याने करण्यात येईल.

संस्थेच्या मुख्य कार्यकारी मंडळाने वेळोवेळी केलेल्या योग्य मार्गदर्शनामुळे ऐरोली शाखेची वाटचाल संस्थेच्या घोषवाक्याला अनुसरून सुरू आहे. ऐरोली शाखेची व्यवस्थापन समिती सर्व कर्मचारी, कंत्राटदार तसेच इतर सर्व संबंधितांची आभारी आहे.
धन्यवाद !

शंकर वीरकर (कार्यवाह) डॉ. आनंद कट्टी (अध्यक्ष)



## कला विभाग - ऐरोली शाखा

श्री. किशोर म. पेंढरकर (अध्यक्ष), श्री. सुधीर वा. बागाईतकर (कार्यवाह), श्री. प्रदीप श्री. नाटेकर,
श्री. मोरेश्वर गोखले

अत्यंत आदरपूर्वक आणि आनंदाने आम्ही वर्ष २०१४-२०१५ या कालावधीचा , कला विभागाचा अहवाल सादर करीत आहोत. कला विभागाच्या धोरणानुसार, प्रायोगिक, प्रबोधनात्मक, वैविध्यपूर्ण, दर्जेदार व नवोदिताना व्यासपीठ देणारे उत्तमोत्तम कार्यक्रम देण्याचा कला विभागातर्फे प्रयत्न करण्यात आला.

झी-गौरव,म.टा.सन्मान, महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धा , कामगार कल्याण स्पर्धा अशा अनेक स्पर्धांमधून पारितोषिक प्राप्त ठरलेले, श्री. संजय कृष्णाजी पाटील लिखित व श्री. अभिजित झुंझारराव दिग्दर्शित 'लेझीम खेळणारी पोरं' हे दर्जेदार नाटक सादर करण्यात आले. कोरसाचा सुंदर वापर, ओघवती शैली व सर्व कलाकारांचा उत्कृष्ट अभिनय, या सर्व गोष्टींमुळे प्रेक्षकांना खिळवून ठेवले व एक उत्तम व दर्जेदार कलाकृतीची अनुभूती प्रेक्षकांना मिळाली.

मोदी सरकारचा प्रथम अर्थसंकल्प, यंदा जुलै २०१४ मध्ये सादर करण्यात आला. या अर्थसंकल्पाची खास वैशिष्ट्ये प्रख्यात अर्थतज्ज्ञ श्री. चंद्रशेखर टिळक यांनी अतिशय सुंदर पद्धतीने उलगडून दाखवली. सर्वसामान्य पगारदारांना काय लाभ झाला , यापेक्षा अर्थसंकल्पातील विविध तरतुदींचे राज्य-निहाय वाटप व त्यातून दिसणारी मोदींची दूरदृष्टी अतिशय सोप्या भाषेत समजावून सांगितली व अर्थसंकल्पाकडे पाहण्याचा व्यापक दृष्टीकोन त्यांनी दिला.

सुप्रसिद्ध, प्रतिभावान व संवेदनशील कवी व उत्कृष्ट अभिनेता सौमित्र म्हणजेच श्री. किशोर कदम यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारून त्यांना बोलते केले जेष्ठ कलाकार श्री. उदय सबनीस आणि नामांकित दिग्दर्शक श्री. विजू माने यांनी. रसिक प्रेक्षकांनी , श्री. किशोर कदम यांचा कवी तसेच एक अभिनेता म्हणून प्रवासाचा अनुभव , त्यांची जडण-घडण गप्पांमधून अनुभवली.

कोजागिरीच्या चांदण्यात , रसिक प्रेक्षक सुप्रसिद्ध गायिका अनुजा वर्तक व सुप्रसिद्ध कवी अरूण म्हात्रे यांच्या गायन , निवेदन आणि कवितेत न्हाऊन निघाले. अल्पोपहार व मसाला दुधासह रसिक प्रेक्षकांनी कोजागिरी पौर्णिमेचा आस्वाद घेतला.

लोकमान्य टिळक यांनी लिहिलेल्या -गीतारहस्य -या ग्रंथाला यंदा १०० वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने सुप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ, अभ्यासक व विचारवंत श्री. दा. कृ. सोमण यांचे विवेचन आयोजित करण्यात आले. अत्यंत ओघवत्या शैलीत सादर झालेल्या या कार्यक्रमानंतर रसिक प्रेक्षकांनी देखील प्रश्नोत्तराच्या कार्यक्रमात अतिशय उत्साहाने भाग घेऊन आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

पहिल्याच प्रयत्नात मंगळस्वारी यशस्वी करून भारत हा जगातील पहिला देश ठरला. इस्त्रोच्या या ऐतिहासिक मोहिमेने प्रत्येक भारतीयाला अभिमानास्पद वाटले. या मंगळयान मोहिमेची विशेषता तज्ज्ञ व्यक्तींकडून दृक्-श्राव्य माध्यमातून रसिक प्रेक्षकांसमोर उलगडून दाखवण्यात आली. प्रेक्षकांनी , अतिशय उत्साहाने या कार्यक्रमात सहभाग घेतला. विद्यार्थीवर्गाची उपस्थितीही लक्षणीय होती.

हसणे आणि चिंतन करणे या दोन परस्पर विरोधी गोष्टी वाटतात, पण गंभीर न होता हंसत-खेळत चिंतन करणे किंवा चिंतनातून हास्य आणि हास्यातून चिंतन हे साधण्याचा प्रयत्न कला विभागाच्या हास्यचिंतन या कार्यक्रमातून करण्यात आला. हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर वझे यांनी अतिशय हंसत-खेळत, छोट्या छोट्या गंमतीशीर गोष्टी सांगून त्यातूनच मोठा आशय उलगडवत , चिंतन करायला लावून सादर केला. रसिकप्रेक्षकांनी अतिशय हास्यपूर्वक, चिंतनशील होऊन या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

दरवर्षीप्रमाणे विभागातर्फे एकपात्री अभिनय स्पर्धा घेण्यात आली, त्यांत स्पर्धकांनी उत्तम प्रतिसाद दिला. ऐरोलीच्या बाहेरील स्पर्धकांनीही भाग घेतला.

मनुष्यजन्म हा अतिशय दुर्लभ असतो. प्रगत विज्ञानामुळे उपलब्ध अवयवदानामुळे, आपल्या मृत्यूनंतरही गरजवंतांचे आयुष्य , आपण सुखकर करू शकतो. त्यासाठी आपली पारंपारिक मानसिकता बदलणे गरजेचे आहे. अवयवदानासंदर्भात प्रबोधन करण्यासाठी ‘सु-मती’समुहाचे श्री. विनोद हरिया व त्यांचे सहकारी उपस्थित होते. त्यांनी अतिशय शास्त्रीय पद्धतीने , अवयवदानाचे महत्त्व आणि त्या संदर्भातील वाटचाल उलगडवून दाखवली. दूर दूर अंतरावरून प्रेक्षक या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

सुप्रसिद्ध कवी आणि साहित्य समेलनाध्यक्ष श्री. अशोक नायगांवकर यांच्या उपस्थितीत जागतिक मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. श्री. अशोक नायगांवकर यांनी प्रेक्षकांशी मनमोकळ्या गप्पा मारत त्यांना हंसवता-हंसवता , विविध सामाजिक विषयांना स्पर्श करत अंतर्मुख केले. एक सुंदर अनुभूती प्रेक्षकांनी अनुभवली व जागतिक मराठी भाषा दिन उत्साहाने साजरा झाला.

भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक बदल घडवून आणण्यासाठी आपले पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी ‘मेक इन इंडीया ’चा नारा दिला. जगभरातून आपल्या देशांत गुंतवणूक यावी, यासाठी ते विशेष प्रयत्न करीत आहेत. भावनिक दृष्ट्या हा एक छान नारा आहे पण तो वास्तवात येणे शक्य आहे का? व असल्यास त्यासाठी काय करणे आवश्यक आहे. या गोष्टींचा उहापोह सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व संस्थेचे माजी विश्वस्त अभिजित फडणीस यांनी अत्यंत सोप्या भाषेत प्रेक्षकांना समजावून दिला. अतिशय उद्‌बोधक अशा या कार्यक्रमात देखील विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय होती.

कला विभागाच्या सर्व कार्यक्रमांना, कार्यकारी मंडळाचे उत्तम सहकार्य, मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. सर्व कार्यकारी मंडळाचे आभार, तसेच सर्व कर्मचारी, कामत बॅन्क्वेट्स व विविध वृत्तपत्रांचे आभार.
पुढील वर्षी देखील वैविध्यपूर्ण कार्यक्रम देण्याचा आपणा सर्वांच्या सहकार्याने आम्ही प्रयत्न करू.

| | |
|---|---|
| श्री. सुधीर बागाईतकर<br>(कार्यवाह) | श्री. किशोर पेंढरकर<br>(अध्यक्ष) |

***अभिप्राय :***

*महाराष्ट्र सेवा संघाच्या ऐरोली शाखेच्या कार्यक्रमाला आज येण्याची संधी मिळाली. संस्थेच्या उपक्रमांतील सातत्य, दूरदृष्टी, आपुलकी निश्चितच कौतुकास्पद आहे.*

*.....चंद्रशेखर टिळक, २७ जुलै,२०१४*

**अभिप्राय :**

*महाराष्ट्र सेवा ....मुलुंड पश्चिमेच्या अनेक कार्यक्रमांना येण्याचा योग आलेला आहे. आज इथे पूर्वेला लोकांशी शेअर करण्याचा योग आला. आनंद झाला. धन्यवाद!*

*.....सौमित्र, २२ ऑगस्ट,२०१४*

**अभिप्राय :**

*गीतारहस्य ग्रंथ शतकपूर्तीनिमित्त व्याख्यान देण्यासाठी मी महाराष्ट्र सेवा संघात आलो होतो. लोकांची उपस्थिती चांगली होती. कार्यकर्त्यांचा उत्साहही चांगला होता. सेवा संघातर्फे समाजप्रबोधनाचे कार्य होत आहे. माझ्या शुभेच्छा!*

*.....दा.कृ.सोमण, २२ नोव्हेंबर,२०१४*

## मैत्री

सुनीता देवधर (अध्यक्ष), विजया गोखले (उपाध्यक्ष), दर्शना निमसे (कार्यवाह), शैला ब्राह्मणकर (सहकार्यवाह)
**सदस्य**- आराधना दाभोळकर, दीपिका साळसकर , मंदा कदम , माधवी देशमुख, जया वानखेडे, प्रिया थोरात, हेमा दळवी, दक्षता झगडे, विजया मढवी

### मैत्री अहवाल २०१४-१५

नवी मुंबई, ऐरोली येथील सर्व महिलांना कला, साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्राची दालने खुली करुन देणारी एकमेव संस्था म्हणजे महाराष्ट्र सेवा संघ, ऐरोली शाखा . ऐरोलीतील समस्त स्त्रियांना मुक्त व्यासपीठ निर्माण करुन देणारा मैत्री हा महिला विभाग. मैत्रीने यंदा ११ व्या वर्षात पदार्पण केले आहे तेव्हा २०१४ - १५ चा अहवाल सादर करताना आम्हाला आनंद होत आहे.

**संस्कार शिबिर :** आठ ते चौदा वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्षीप्रमाणे संस्कार शिबिर आयोजित करण्यात आले. यात ऐरोलीतील अनेक शाळांमधून १९ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. -शिबिराचा विषय होता ''छंद ''. शिवाय पौष्टिक खाऊही होताच. शिबिराची सुरुवात रोज मनाचे श्लोक, सत्यम शिवमं सुंदरा, हमको मन की शक्ती देना या प्रार्थनेने होई. रोजच्या कार्यक्रमाची सांगता लख लख चंदेरी तेजाची या समुह नृत्याच्या सरावाने होत असे.
**१४ एप्रिल २०१४ :** प्रभाताई देशमुख या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. मुलांना छंद जोपासण्याची कला अवगत कशी करावी हे सांगताना त्यांनी अनेक मजेशीर गोष्टी सांगितल्या.
**१५ एप्रिल २०१४ :** डॉ.लक्ष्मीकांत कासट यांनी विद्यार्थ्यांना आपल्या राष्ट्रध्वजाची माहिती व महती चित्रफितीच्या साहाय्याने अतिशय ओजस्वी भाषेत दिली.
**१६ एप्रिल २०१४ :** पिडीलाईट लि.कं. च्या विद्या अनघोळकर यांनी मुलांना 'फॅब्रिक पेंटींग', 'ओरिगामी व पॉपअप ग्रीटिंग कार्ड' बनवावयास शिकवले.
**१७ एप्रिल २०१४ :** श्री संदीप येवले यांनी अभिनय कलेविषयी मुलांना मार्गदर्शन केले व मुलांना अभिनय कसा करावा ते समजावून सांगताना मुलांचे गट करून त्यांना वेगवेगळे विषय देऊन अभिनय कसा करावा हे शिकविले.
**१८ एप्रिल २०१४ :** जगदिश देवलिया या कुंभारानी प्रत्यक्ष कुंभाराच्या चाकावर पणती, फ्लॉवरपॉट शिकविले. कुंभाराचे चाक चालविताना मुलांची दमछाक झाली पण आनंदही मिळाला.
**२० एप्रिल २०१४ :** अंगी चपळता व उत्साह निर्माण करणारा 'झुंबा' या अमेरिकन फिटनेस डान्सचे श्वेता कुलकर्णी यांनी प्रशिक्षण दिले.
**२१ एप्रिल २०१४ :** 'ओरीगामी' या हस्तकला प्रकारात दीपिका साळसकर यांनी मुलांना कागदाची फुले, पेन्सील बॉक्स विविध पक्षी बनविण्यास शिकवले.
**२२ एप्रिल २०१४ :** समारोपाच्यादिवशी प्रमुख पाहुण्या संपदा वागळे (प्रथितयश लेखिका) यांनी विद्यार्थ्यांना छंद का जोपासावे हे समजून सांगितले आणि या संस्कार शिबिरामुळे विद्यार्थ्यांनी सुट्टीचा खरा आनंद लुटला . शिबिरात शिकवलेल्या वस्तुंचे प्रदर्शनही मांडले होते. यानंतर पाहुण्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे व सर्व विद्यार्थ्यांना छंद नावाची प्रमाणपत्रे देण्यात आली. अखेर मुलांनी सांस्कृतिक कार्यक्रमात 'लखलख चंदेरी तेजाची' हे समुह नृत्य सादर केले. त्याचदिवशी 'चैत्रोत्सव'ही साजरा करण्यात आला.

**०६ जून २०१४ : ॐकार श्वसन कार्यशाळा** - यात कीर्तनकार श्रीमती सुनीताताई रानडे यांनी आरोग्यदायी प्राणायम कसा करावा याचे मार्गदर्शन प्रात्यक्षिकामार्फत महिलांना शिकविले.
**०५ जुलै २०१४ : शब्दांचे भरले रांजण** - या कार्यक्रमात मैत्रीच्या सभासदांनी शब्द,निर्णय व पाऊल यापैकी एकेका शब्दावर आपले विचार मांडले. मोठया संख्येनी मैत्रिणींनी यात सहभाग घेतला.
**१९ जुलै २०१४ : विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल** - या कार्यक्रमात आषाढी एकादशीच्या निमित्ताने ऐरोलीतील अनेक भजनीमंडळांनी अभंग सुरेल व भाव पूर्ण आवाजात सादर केले. अनेकांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.
**०२ ऑगस्ट २०१४ : मानस सरोवर पायी यात्रा अनुभव कथन**- या कार्यक्रमात श्री. एस.आर. कुलकर्णी यांनी मानस सरोवर यात्रेचे

आपले अनुभव चित्रफितीव्दारे कथन केले. अनेक स्त्री -पुरुष या कार्यक्रमात हजर होते.

**१६ ऑगस्ट २०१४ : आहार आणि सौंदर्य** - या कार्यक्रमाव्दारे डॉ. सुचेता सावंत यांनी आपले सौंदर्य खुलविण्यासाठी आपला आहार कसा असावा याचे महत्त्व विशद केले. मैत्रिणींचा उत्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**१२,१३ व १४ सप्टेंबर २०१४ : ग्राहक मेळावा** - विविध उपयोगी वस्तुंचे प्रदर्शन व विक्री असे ग्राहक मेळाव्याचे स्वरुप होते. उज्ज्वला करंबळेकर (जनकल्याण बँकेच्या अधिकारी)यांच्या हस्ते ग्राहक मेळाव्याचे उद्घाटन झाले. या मेळाव्यात खाद्यपदार्थ, मसाले, गिफ्ट आर्टिकल्स, ड्रेस मटेरिअल, साडया, पर्सेस, सौंदर्यप्रसाधने, आयुर्वेदिक उत्पादने, आकर्षक भेटवस्तूंचे स्टॉल्स माफक दरात उपलब्ध होते. रुपये ५००/- व रु.२०००/- च्या खरेदीवर आकर्षक भेटवस्तू ग्राहकांना देण्यात आल्या. भेटवस्तू योजनेमुळे विक्रीवर चांगला परिणाम झाला. समारोपाच्यादिवशी प्रमुख पाहुण्या डॉ. आशा परुळेकर यांनी स्टॉलधारक महिला उद्योजकांना मोलोचे मार्गदर्शन केले. एकूण ७३ स्टॉल मिळून रू. ४६१३०/- एवढी रक्कम संस्थेकडे सूपूर्त करण्यात आली.

**२० सप्टेंबर २०१४ : हितगुज** - या कार्यक्रमाच्या सादरकर्त्या होत्या श्रीमती विजया पेंडसे आणि दिप्ती कुलकर्णी. या कार्यक्रमात त्यांनी स्वरचित कविता सादर केल्या. मैत्रिणींनी मनमुराद आनंद घेतला.

**०४ ऑक्टोबर २०१४ : पारंपारिक खेळ** - दांडिया, मंगळागौर या कार्यक्रमात मैत्रिणींनी सहभाग घेताना व मंगळागौर, भोंडलाच्या गाण्यांवर मनमुराद नृत्याचा आनंद लुटला.

**१८ ऑक्टोबर २०१४ : भव्य रांगोळी स्पर्धा** - महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांना एक व्यासपीठ उपलब्ध व्हावे या हेतूने यावर्षी प्रथमच भव्य रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ''बहरलेला निसर्ग'' हा विषय या स्पर्धेसाठी ठेवला होता. यात तीन बक्षिसे देण्यात आली. दिवसभर हे रांगोळी प्रदर्शन सर्वांसाठी खुले ठेवण्यात आले होते. प्राजंली चितळे व किशोरी मानकामे यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले.

**०१ नोव्हेंबर २०१४ : मनोरंजनात्मक कार्यक्रम - अंताक्षरी** - या कार्यक्रमात मैत्रीच्या सभासदानी उपस्थित राहून हिंदी आणि मराठी गाण्यांच्या भेंडया खेळत कार्यक्रमाला रंगत आणली.

**१५ नोव्हेंबर २०१४ : चैतन्याचे झाड** - या कार्यक्रमात श.ना. नवरेंच्या लेखनावर आधारित कथाकथनाच्या कार्यक्रमात सुहास कऱ्हाडकर, स्मिता जोशी व मेधा देव यांनी सुंदर सादरीकरण केले व श.नांच्या कथेतील पात्रे डोळयासमोर जिवंत साकार केली.

**१३ डिसेंबर २०१४ : १० वा वर्धापन दिन सोहळा** - अत्यंत उत्साहाने व आनंदाने साजरा होणारा असा हा कार्यक्रम. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात 'श्वास ' या चित्रपटाच्या कथा लेखिका माधवी घारपुरे यांच्याहस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. राष्ट्रनिर्मितीत आईचे स्थान या विषयांतर्गत त्यांनी अनेक कथांव्दारे आईचे महत्व विशद केले. सुप्रसिध्द लेखिका डॉ.विजया वाड यांची १०० पुस्तके प्रकाशित झाल्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला.मैत्रीच्या १० वर्षाच्या काळातील कामाची त्यांनी प्रशंसा केली. त्यांच्या हस्ते ''मैत्री - एक संस्कार '' या स्मरणिकेचे प्रकाशन झाले. स्मरणिकेतील सर्व लेखिकांचा एक सुंदर मानचिन्ह देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कॉफीपानानंतर दुसऱ्या सत्रात सुप्रसिध्द अभिनेत्री तसेच झी मराठीवरील गाजलेली मालिका 'होणार सून मी या घरची ' मधील छोटी आई - लीना भागवत यांची मुलाखत सहयाद्री वाहिनीवरिल निवेदिका समीरा गुजर यांनी घेतली. आपले अभिनय क्षेत्रात पदार्पण कसे झाले त्यामधी गोड व कटू अनुभव त्यांनीआपल्या उत्साही वाणीतून कथन केले. सर्वजण या गप्पागोष्टी दंग झाले होते. नेहमीच्या प्रथेनुसार मैत्रीच्या वाढदिवसानिमित्त केक कापण्याचा समारंभ साजरा करण्यात आला.

**२७ डिसेंबर २०१४ : मनातली गाणी** - या कार्यक्रमात मैत्रिणींनी आपल्या मनातील आवडती गाणी सादर केली. या बहारदार कार्यक्रमात मैत्रिणींच्या गाण्याने चांगलीच रंगत आणली होती.

**१७ जानेवारी २०१५ : पाककला स्पर्धा** - सोयाबिनचे आहारात अनन्यसाधारण महत्व आहे. म्हणूनच स्पर्धेचा विषय होता सोयाबिनचे तिखट किंवा गोड पदार्थ. या स्पर्धेत अनेक मैत्रिणींनी भाग घेतला होता. सुरुवातीला सौ. मंजू देशमुख यांनी महिलांना सोयाबिन वापराविषयी व प्रक्रिया केलेले सोयाबिनच वापरावे असे सांगितले. विजयी स्पर्धकांस बक्षिसे देण्यात आली. श्रीमती अनुराधा मारावर व रजनी चांदे यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले तसेच स्पर्धकांना अनेक पाककृती सांगितल्या.

**३१ जानेवारी २०१५ - तीळगूळ समारंभ** - या कार्यक्रमात कायदेतज्ज्ञ ॲड. शामला मोकाशी या उपस्थित होत्या. त्यांनी महिलांना कायद्याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. मैत्रिणींना तीळगूळ व संक्रात भेट देण्यात आली.

**०७ फेब्रुवारी २०१५ : बहिणाबाईंची गाणी** - या कार्यक्रमात मैत्रिणींनी बहिणाबाईंच्या कविता सादर केल्या. मैत्रिणींना हा कार्यक्रम खूपच आवडला. अनेक मैत्रिणींनी बहिणाबाईंच्या कविता अतिशय सुंदर सादर केल्या.

**२१ फेब्रुवारी २०१५ : आम्ही घेतो तुमच्या ह्रदयाची काळजी-** या आरोग्यविषयक परिसंवादात 'साने केअर, माधवबाग' येथील डॉ. ओमकार चौधरी व डॉ. स्मिता कर्पे यांनी ह्रदयरोग समज-गैरसमज या विषयी चर्चा, मार्गदर्शन व शंकासमाधान केले तसेच या कार्यक्रमात ह्रदयाच्या तपासणीचे कूपन सवलतीच्या दरात देण्यात आले. यात इ.सी.जी., रक्तदाब, ट्रेडमील टेस्ट व पुन्हा इ.सी.जी. या तपासण्यांचा समावेश होता. अनेकांनी या कार्यक्रमात सहभाग घेऊन या सवलतीच्या दरात तपासण्या करून घेतल्या.

**०७ मार्च २०१५ : बदलती सौंदर्यसाधने :** या कार्यक्रमात डॉ. गायत्री भारव्दाज (एम.डी. त्वचारोगतज्ज्ञ) सौंदर्यप्रसाधनांचा योग्य - अयोग्य वापर आणि त्याचा आपल्या त्वचेवर होणारा परिणाम या विषयी मार्गदर्शन केले.

उपस्थितांच्या प्रश्नांचे व शंकाचे निरसन डॉ.भारव्दाज यांनी केले.

**१४ मार्च २०१५ : गौरव स्त्री शक्तीचा** - जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सामाजिक कार्य करणाऱ्या महिलेचा सन्मान या निमित्ताने केला जातो. या कार्यक्रमात अंध, अपंग, ऑटेस्टिक मुलांसाठी कार्य करणाऱ्या 'सोबती' या संस्थेच्या संचालिका उषा बाळ यांच्या सन्मान करण्यात आला. गौरवपत्र व मानधन असे सन्मानाचे स्वरूप होते. त्यांनी आपला अनुभव सांगताना अंध व अपंग मुलांसाठी आपण काहीतरी केले पाहिजे व त्यांनाही सर्वसामान्यांसारखे जीवन जगण्यासाठी समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केले पाहिजे असे सांगितले. मनाला स्पर्शून जाणारा व अंतर्मुख करणारा असा हा कार्यक्रम होता.

संस्थेच्या पाठिंब्यामुळे व मैत्रिणींच्या सहकार्यामुळेच आज 'मैत्री' ची वाटचाल यशस्वीरीत्या होत आहे. आम्ही कृतज्ञ आहोत, लोभ आहेच, तो वृध्दिंगत व्हावा.

दर्शना निमसे, कार्यवाह — सुनीता देवधर, अध्यक्ष

---

## सुनीता म. देवधर ग्रंथालय

अध्यक्ष - मुकुंद बालंखे , कार्यवाह - प्रीती देशपांडे

सभासद :- आरती सप्रे, संगीता जोशी, श्री. नारायण होनमोरे(वाचक प्रतिनिधी)



रसिकांना, वाचकांना सप्रेम नमस्कार!

ऐरोली शाखेतील 'सुनीता म. देवधर ग्रंथालयामध्ये अनेकविध उपक्रम उत्साहाने सुरू आहेत. ग्रंथालयाचा या आर्थिक वर्षाचा अहवाल सादर करताना विशेष आनंद होत आहे.

गेल्या काही वर्षांपासून ग्रंथालयाचा सर्वांगीण विकास व वाचन संस्कृतीची वाढ या उद्दिष्टांकरिता योग्य धोरणे आखून, योग्य पद्धतीने राबविल्याचे परिणाम दिसून येत आहेत. वाचकांच्या सूचना, पुस्तकांची मांडणी यांची वेळोवेळी सकारात्मक दृष्टिने दखल घेतली जाते व त्यामुळे तक्रारवहीतील पाने कोरीच राहात आहेत. व्यवस्थापनाच्या दृष्टिने ही खूपच समाधान देणारी बाब आहे.

मागील अहवालात नमूद केल्याप्रमाणे सभासदांचे वर्गीकरण करण्याची योजना राबविण्यात आली व ती अतिशय यशस्वी झाली. त्यामुळे सभासद संख्या जास्त असूनही मासिकांच्या देवघेवीत काहीही तक्रारी येत नाहीत आणि उत्पन्नातही वाढ झाली. ग्रंथालयाची 'दिवाळी अंक योजना' लोकप्रिय आहे. या वर्षी ६४ सभासदांनी या योजनेचा लाभ घेतला व रु. १०,६९६/- इतका नफा झाला.

बालविभागातही सभासदांची झालेली वाढ लक्षणीय आहे. जेमतेम १०-१२ वरून ही संख्या ३०-३५ पर्यंत गेली. या अहवालवर्षात या बालगोपाळांसाठी कोणताही कार्यक्रम करता आला नाही. ही कसर येत्या आर्थिक वर्षात नक्की भरून काढू. या विभागात लहान मुलांना आवडतील अशी भरपूर पुस्तके आणली आहेत. 'व्यास क्रिएशन्स'चा 'वाचू आनंदे' या योजनेअंतर्गतचा २०० पुस्तकांचा खजिना व्यवस्थापन एप्रिल २०१५ पासून उपलब्ध करून देणार आहे.

'आषाढस्य प्रथम दिवसे' असे शीर्षक घेऊन खुले कविसंमेलन आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमात अनेक रसिकांनी त्यांना भावलेल्या कवितांचे सुरेख सादरीकरण केले. सुप्रसिद्ध कवी श्री. साहेबराव ठाणगे यांनी त्यांच्या विविध कवितांचे बहारदार सादरीकरण करून कार्यक्रमात बहार आणली. या नंतरचा कार्यक्रम म्हणजे 'नर्मदा परिक्रमा' व 'पंढरीची वारी' यांचे अनुभवकथन. या कार्यक्रमातदेखील श्रोतृवर्गाने उत्फूर्तपणे भाग घेतला. या कार्यक्रमातून खास करून 'नर्मदा परिक्रमा' सारख्या साहसी व अवघड अशा वाटचालीची मौलिक माहिती मिळाली.

'गुरु शिष्य परंपरा' या संकल्पनेवर एक निबंध स्पर्धा आयोजित केली होती. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. या निबंध स्पर्धेच्या बक्षिस समारंभाच्या अनुषंगाने पालक व शिक्षक परिसंवाद असा एक दर्जेदार कार्यक्रम संपन्न झाला. उपस्थित पालक व शिक्षक यांनी

सद्यस्थितीतील शिक्षण पद्धतीवर आपली मते हिरीरीने मांडली.
शिवरायांच्या अष्टराज्ञींपैकी एक व काहिशा उपेक्षित असणाऱ्या पुतळाबाई राणीसाहेब यांच्या जीवनावर आधारित 'धाकट्या राणीसाहेब' ही अतिशय दर्जेदार कादंबरीच्या लेखिका प्रा. वर्षा मुळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुतळाबाईंची कथा थोडक्यात पण समर्पकपणे मांडून श्रोत्यांची मने जिंकली. ग्रंथालयाने आयोजित केलेल्या या सर्व कार्यक्रमांच्या बाबतीत विशेष सांगायचे म्हणजे त्यांची अतिशय कमी आर्थिक झळ विभागाला बसली.
ग्रंथालयाच्या दृष्टिने अत्यंत आनंदाची गोष्ट म्हणजे आपल्या संस्थेचे विश्वस्त व ऐरोलीचे आधारस्तंभ श्री. म.बा देवधर यांनी ऐरोली ग्रंथालयासाठी दिलेली रु. ३ लाख अशी भरीव देणगी! त्यांचे मनापासून आभार. ग्रंथालयाचा विस्तार व्हावा असा विचार सुरू होता आणि ऐरोली कार्यकारी मंडळाने ग्रंथालयाच्या विस्ताराची कल्पना तात्काळ उचलून धरली व हा विस्तार झाला देखील! त्यामुळे हे ग्रंथालय अधिक प्रशस्त व आकर्षक बनले आहे. या विस्तारामुळे पुढील काही वर्षे तरी जागेची कमी जाणवणार नाही याची खात्री वाटते.
ग्रंथ म्हणजे समाजाचा सांस्कृतिक पाया आहे असे आम्ही मानतो. एकूण ६६६० पुस्तके व ५२५ सभासद यांचा कारभार ग्रंथपाल, व्यवस्थापिका व इतर सर्व करमचारीवर्ग उत्कृष्टपणे पेलत आहेत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सूत्रबद्धरित्या झालेली मार्च महिन्यातील ग्रंथमोजणी. ग्रंथालयाच्या सभासदांना पुस्तक वाचनापासून वंचित न ठेवता कमीतकमी वेळात ग्रंथमोजणी झाली. सर्व कर्मचारी वर्गाचे अभिनंदन व मन:पूर्वक आभार. तसेच ऐरोली कार्यकारी मंडळाचे! वेळोवेळी संपूर्ण सहकार्य , प्रोत्साहन यामुळेच ही यशस्वी वाटचाल साध्य करता आली त्यांचे मन:पूर्वक आभार!
असेच मार्गदर्शन व पाठिंबा यापुढेही मिळत राहील या विश्वासासह......धन्यवाद!

प्रीती देशपांडे, कार्यवाह — मुकुंद बालंखे, अध्यक्ष

## अभ्यासिका

आरती सप्रे (कार्यवाह) — विजय द. जगताप (अध्यक्ष) — मुकुंद शं. बालंखे (सभासद)

या उपक्रमाने अतिशय उत्तम कामगिरी केली आहे. प्रथम सत्रात ५५३ व द्वितीय सत्रात ५०९ विद्यार्थ्यांनी अभ्यासिकेत प्रवेश घेतला. नवी मुंबईतील ऐरोली ते पनवेल पर्यंतचे तसेच मुंबईतील अनेक विद्यार्थी आपल्या या उपक्रमाचा लाभ घेतात.

आरती सप्रे, कार्यवाह — विजय जगताप , अध्यक्ष

***अभिप्राय :***
*या कार्यक्रमाला येऊन खूप छान वाटले. शिक्षक-पालक परिसंवाद खूपच छान झाला. कार्यक्रमाचे आयोजन खूप छान होते. ग्रंथालयाच्या अश्याच उत्तम कार्यक्रमांना मन:पूर्व शुभेच्छा! धन्यवाद !*

*..... नंदिनी हंबर्डे, ८ नोव्हेंबर,२०१४*

**अभिप्राय :**
*महाराष्ट्र सेवा संघ, ऐरोली शाखेला आज ६ डिसेंबर,२०१४ रोजी 'मंगळयान सफर' या कार्यक्रमानिमित्त भेट दिली. संस्थेच्या कार्याचा व्याप आणि विविधता पाहाता पदाधिकारी आणि कर्मचारी यांचे हार्दिक अभिनंदन, शुभेच्छांसह!*

*..... मिलिंद काळे, खगोल मंडळ*

# ऐरोली ग्रंथालय - ग्रंथस्थिती

| **वर्षातील नवीन ग्रंथ खरेदी** | **वर्षात देणगी दाखल मिळालेले ग्रंथ** | **एकूण** |
|---|---|---|
| १८८ | ३०० | ४८८ |

**३१-०३-२०१५ रोजी उपलब्ध ग्रंथ - ६६६०**

अहवाल वर्षात २९,५८६/- रुपये किमतीची ग्रंथखरेदी करण्यात आली.

**ग्रंथालय सभासद तपशील**

| ३१-३-२०१५ अखेर सभासद | विशेष सभासद | बाल विभाग | ग्रंथ विभाग |
|---|---|---|---|
| | ६ | ३२ | २८७ |
| ग्रंथ -अंक विभाग | दीर्घ मुदत सदस्य | अंक विभाग | एकूण |
| १९२ | १२ | ९ | ४६३ |

**ग्रंथालयात दरमहा येणाऱ्या अंक, मासिके व साप्ताहिके यांचा तपशील**

| प्रकार | मासिके | त्रैमासिके | पाक्षिके | साप्ताहिके |
|---|---|---|---|---|
| मराठी | ४५ | - | २ | ६ |
| हिंदी | १ | - | – | १ |
| इंग्रजी | ६ | - | – | १० |
| एकूण | ५२ | - | २ | १७ |

**दिवाळी अंक योजना**

| | |
|---|---|
| सभासद संख्या | ५१ |
| अंकाच्या एकूण प्रती | १११ |
| खरेदी किंमत रुपये | १०,०२४/- |

**मोफत वाचनालयासाठी घेण्यात येणारी वृत्तपत्रे**

| **प्रकार** | **संख्या** | **नाव** |
|---|---|---|
| मराठी | ९ | महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, नवाकाळ, सकाळ, सामना, लोकमत, वार्ताहर पुढारी, धावते नवनगर |
| हिंदी | १ | नवभारत टाईम्स |
| इंग्रजी | ४ | टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, डी.एन्. ए., मुंबई मिरर |

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड तर्फे देण्यात आलेले सु.ल. गद्रे (मातोश्री) साहित्यिक, कलाकार व कै. ल.ग. गद्रे शैक्षणिक पुरस्कार तसेच सु.ल. गद्रे साहित्यिक, कलाकार व महाराष्ट्र सेवा संघाचा सामाजिक संस्था पुरस्कार खालीलप्रमाणे

| वर्ष | साहित्यिक पुरस्कार | कलाकार पुरस्कार | शिक्षक / संस्था पुरस्कार |
|---|---|---|---|
| १९९४ | श्रीमती शांता शेळके | श्रीमती भक्ती बर्वे | सर्वश्री. वसंतराव आगाशे व हरेराम बोडस |
| १९९५ | श्री. शं.ना.नवरे | श्रीमती ललिता पवार | सर्वश्री. चंद्रकांत मापारी व कृ.ल.पटवर्धन |
| १९९६ | श्रीमती सरोजिनी वैद्य | श्री. यशवंत देव | श्री. सय्यद गुलाम दस्तगीर व श्रीमती रेणू दांडेकर |
| १९९७ | श्री. अनिल अवचट | श्रीमती सुचेता भिडे चापेकर | सर्वश्री. अनिल जोशी व भानसिंग पाटील |
| १९९८ | श्री. रत्नाकर मतकरी | श्री. बाबूराव सडवेलकर | श्री. अरुण जोशी व श्रीमती विजया वाड |
| १९९९ | श्रीमती मंगला गोडबोले | श्री. रामदास पाध्ये | श्री. रामकुमार सावंत व श्रीमती वर्षा सहस्त्रबुध्दे |
| २००० | श्रीमती आशा बगे | श्री. शि. द. फडणीस | सर्वश्री. वामन हेर्लेकर, कुलकर्णी व अरुण फाटक |
| २००१ | श्री. लक्ष्मण लोंढे | श्रीमती प्रभा अत्रे | श्री. न.ल. गाडगीळ व श्रीमती सुचेता पडळकर |
| २००२ | श्री. ह.मो. मराठे | श्रीमती प्रिया तेंडुलकर | सावरकर प्रतिष्ठान ,सांगली |
| २००३ | श्रीमती अरुणा ढेरे | श्री. भरत दाभोळकर | दादोजी कोंडदेव सैनिकी शाळा, तांसगांव |
| २००४ | श्री. मारुती चित्तमपल्ली | श्रीमती स्मिता तळवलकर | राणी लक्ष्मीबाई सैनिकी मुलींची शाळा, पुणे |
| २००५ | श्री. अशोक जैन | श्री. अरविंद गजेंद्रगडकर | सर्वश्री श्री. बाळासाहेब माने व विठ्ठल माने |
| २००६ | श्रीमती प्रतिभा रानडे | श्री. नितीन देसाई | सर्वश्री. रमेश लोणारे व मनोहर नरांजे |
| २००७ | श्रीमती मीना प्रभू | श्री. मोहन जोशी | प्रबोधिनी ट्रस्ट, नाशिक |
| २००८ | श्रीमती उमा कुलकर्णी | श्री. अशोक पत्की | आविष्कार, रत्नागिरी |
| २००९ | श्री. जगदीश खेबूडकर | श्रीमती उषा मंगेशकर | वात्सल्य ट्रस्ट, मुंबई |
| २०१० | डॉ. जयंत नारळीकर | श्री. दिलीप प्रभावळकर | लोकबिरादरी प्रकल्प, हेमलकसा |
| २०११ | श्री. ना.धों. महानोर | सौ. वीणा सहस्त्रबुद्धे | कुष्ठरोग निवारण समिती, नेरे, पनवेल. |
| २०१२ | डॉ. विजया राजाध्यक्ष | श्री. विक्रम गोखले | मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र - पुणे |
| २०१३ | प्रा. शेषराव मोरे | श्री. प्रशांत दामले | सह्याद्रि आदिवासी बहुविध सेवा संघ, देवबांध |
| २०१४ | श्री. निरंजन घाटे | श्री. उत्तम पाचारणे | हेल्पर्स ऑफ दी हॅन्डिकॅप्ड, कोल्हापूर |
| २०१५ | डॉ. प्रतिमा इंगोले | डॉ. मोहन आगाशे | ——- |

## पं. वासुदेव आत्माराम लाटकरशास्त्री संस्कृत सन्मान पुरस्कार

| वर्ष | पुरस्कारप्राप्त विद्वान | क्षेत्र |
|---|---|---|
| २०११ | श्री. देवदत्त गोविंद पाटील | अध्ययन व अध्यापन |
| २०१२ | डॉ. भाग्यलता पाटसकर | अध्ययन व अध्यापन |
| २०१३ | डॉ. मल्हार कुलकर्णी | अध्ययन व अध्यापन |
| २०१४ | श्री. गणेश्वर सांब दीक्षित | अध्ययन व अध्यापन |

वैविध्यपूर्ण साहित्यकृतींना प्रोत्साहन मिळावे म्हणून 'साहित्य साधना' पुरस्कार न.चिं. केळकर ग्रंथालयाने १५-०४-२००६ पासून सुरू केला आहे.

| **वर्ष** | **पुरस्कारप्राप्त लेखक** | **साहित्यकृती** |
|---|---|---|
| २००६ | श्री. भारत सासणे | शुभवर्तमान |
| २००७ | श्री. गिरीश प्रभुणे | पारधी |
| २००८ | डॉ. संजय ओक | अवनत होई माथा |
| २००९ | श्री. सुमेध वडावाला | मनश्री |
| २०१० | डॉ. संजय ढोले | प्रेमाचा रेणू |
| २०११ | श्री. गिरीश कुबेर | युद्ध जिवांचे |
| २०१२ | श्रीमती आशा आपराद | भोगिले जे दु:ख त्याला |
| २०१३ | डॉ. सदाशिव शिवदे | ज्वलज्ज्वलनतेजस संभाजी राजा |
| २०१४ | हेमंत देसाई | बॉम्बे टॉकीज |
| २०१५ | डॉ. इसादास भडके | गन गन भोवरी |

**विविध कलाक्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ कलाकाराचा सन्मान**

| **वर्ष** | **कलाकाराचे नाव** | **क्षेत्र** |
|---|---|---|
| २००५ | श्री. दशरथ पुजारी | संगीत |
| २००६ | श्री. के.ज.पुरोहित (शांताराम) | साहित्य |
| २००७ | श्री. भालचंद्र पेंढारकर | नाट्य. |
| २००८ | श्री. सुहास भालेकर | लोकनाट्य |
| २००९ | श्री. मोरेश्वर कुंटे | मंदिर कोशकार |
| २०१० | श्री. प्रभाकर जोग | व्हायोलीन वादक, संगीतकार |
| २०११ | श्री. भा. ल. महाबळ | साहित्य |
| २०१२ | श्रीमती पुष्पा पागधरे | गायन |
| २०१३ | श्री. चंद्रकांत खोत | साहित्य |
| २०१४ | श्री. वसंत आजगावकर | गायन |

***अभिप्राय :***

*ॐकार श्वसन कार्यशाळा - महाराष्ट्र सेवा संघाच्या मैत्रीने मला श्वसन, प्राणायाम, ॐकार शिकविण्यासाठी आमंत्रित केल्याचा अनंद खूप आहे. सगळ्यांचे उच्चार खूप चांगले झाले. धन्यवाद, जयॐ!*

*.....सौ. सुनीता रानडे.२१ जून,२०१४*

***अभिप्राय :***

*महाराष्ट्र सेवा संघ, ऐरोलीच्या भव्य वास्तूत नेहमीच माहेरचा आपलेपणा जाणवतो. सर्व कार्यकारिणीच्या सदस्यांमध्ये वेगळीच धडाडी जाणवते. 'मैत्री'चे कार्य अधिकाधिक यशस्वी होवो ही शुभेच्छा!*

*..... डॉ. सुचेता सावंत, १६ ऑगस्ट,२०१४*